रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

भारत का राजपत्र
The Gazette of India
भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 1] | नई दिल्ली, जनवरी 22-28, 2026/माघ 2-8 (शक) 1947 | [ खंड 23 |
| No. 1] | NEW DELHI, JANUARY 22-28, 2026/MAGHA 2-8 (SAKA) 1947 | [Vol. 23 |
| अं. १] | नवी दिल्ली, जानेवारी २२-२८, २०२६/माघ २-८ (शके) १९४७ | [ खंड २३ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि बिल्डिंग अँड अदर कंस्ट्रक्शन वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट अँड कंडिशन्स् ऑफ सर्विस) ॲक्ट, 1996 ; (2) दि ट्रांसजेंडर पर्सन्स् (प्रोटेक्शन ऑफ राईटस्) ॲक्ट, 2019 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड् (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Building and other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 1996 ; (2) The Transgender Persons (Protection of Rights) Act, 2019 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (a) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि बिल्डिंग अँड अदर कंस्ट्रक्शन वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट अँड कंडिशन्स् ऑफ सर्विस) ॲक्ट, १९९६ ; (२) दि ट्रांसजेंडर पर्सन्स् (प्रोटेक्शन ऑफ राईट्स) ॲक्ट, २०१९ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतींच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

निर्देशसूची

INDEX



| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, १९९६.<br>The Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 1996. | ५ |
| २ | तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९.<br>The Transgender Persons (Protection of Rights) Act, 2019. | ३१ |

## इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, १९९६

## (१९९६ चा अधिनियम क्रमांक २७)

[ २६ सप्टेंबर, २०२५ रोजी यथाविद्यमान ]

[१९ ऑगस्ट, १९९६.]

इमारत व इतर बांधकाम कामगार यांच्या रोजगाराचे व सेवाशर्तींचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांची सुरक्षितता, आरोग्य व कल्याणकारी उपाययोजना आणि त्यांच्याशी संबंधित व तदानुषंगिक इतर बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :-

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.**

**१.** (१) या अधिनियमास, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, १९९६, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण भारतभर लागू असेल.

(३) तो, १ मार्च, १९९६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) तो, ज्या आस्थापनेने कोणतीही इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामांमध्ये दहा किंवा त्यापेक्षा अधिक इमारत कामगारांना पूर्ववर्ती बारा महिन्यांपैकी कोणत्याही दिवशी नोकरीवर ठेवले आहे किंवा नोकरीवर ठेवलेले होते अशा प्रत्येक आस्थापनेला लागू आहे.

**स्पष्टीकरण.—** या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एकतर नियोक्त्याने किंवा कंत्राटदाराने एखाद्या दिवशी वेगवेगळ्या पाळ्यांमध्ये नोकरीवर ठेवलेले इमारत कामगार, आस्थापनेत नोकरीवर ठेवलेल्या इमारत कामगारांची गणना करताना, विचारात घेण्यात येतील.

**व्याख्या.**

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "समुचित शासन" याचा,—

१९४७ चा १४. (एक) जिच्या बाबतीत समुचित शासन हे, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ अन्वये केंद्र सरकार आहे त्या आस्थापनेच्या (जी इमारत कामगारांना एकतर थेट किंवा कंत्राटदारामार्फत नोकरीवर ठेवते अशा) संबंधातील अर्थ, केंद्र सरकार, असा आहे;

(दोन) जी, इमारत कामगारांना एकतर थेट किंवा कंत्राटदारामार्फत नोकरीवर ठेवते अशा, केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असणाऱ्या कोणत्याही आस्थापनेच्या संबंधातील अर्थ, केंद्र सरकार, असा आहे;

**स्पष्टीकरण.—** उपखंड (दोन) च्या प्रयोजनार्थ, "सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम" याचा अर्थ, कोणत्याही केंद्रीय, राज्य किंवा प्रांतिक अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेले कोणतेही महामंडळ किंवा केंद्र सरकारची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा त्याच्याकडून व्यवस्थापन केले
१९५६ जात असलेली, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, शासकीय कंपनी,
चा १. असा आहे;

(तीन) जी, इमारत कामगारांना एकतर थेट किंवा कंत्राटदारामार्फत नोकरीवर ठेवते अशा इतर कोणत्याही आस्थापनेच्या संबंधातील अर्थ, ज्या राज्यात अशी इतर आस्थापना स्थित आहे ते राज्य शासन, असा आहे;

(ख) "लाभार्थी" याचा अर्थ, कलम १२ अन्वये नोंदणी केलेला इमारत कामगार, असा आहे;

(ग) "मंडळ" याचा अर्थ, कलम १८ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेले, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, असा आहे;

(घ) "इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम" याचा अर्थ, इमारती, रस्ते, मार्ग, रेल्वेमार्ग, ट्राममार्ग, हवाई क्षेत्रे, पाटबंधारे, जलनिःसारण, बंधारे व नौकानयन कामे, पूर नियंत्रण कामे (पर्जन्यजल निःसारण कामांसह), वीज निर्मिती, पारेषण व वितरण, जलविषयक कामे (जल वितरण कालव्यांसहित), तेल व वायू संचमांडणी, विद्युत तार मार्ग, बिनतारी यंत्रणा, रेडिओ, दूरदर्शन, दूरध्वनी, तारयंत्र व विदेश संपर्क यंत्रणा, धरणे, कालवे, जलाशये, जलप्रवाह, बोगदे, पूल, पार सेतू, जलसेतू, जलवाहिन्या, मनोरे (टॉवर्स), शीतन मनोरे (कुलिंग टॉवर्स), पारेषण मनोरे आणि समुचित शासनाकडून याबाबतीत अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे इतर काम यांचे किंवा त्यासंबंधातील बांधकाम, फेरबदल, दुरुस्ती, परिरक्षण किंवा, ते पाडून टाकणे, असा आहे परंतु, त्यामध्ये, कारखाने अधिनियम, १९४८ किंवा खाण अधिनियम, १९५२ यांच्या तरतुदी ज्यांना लागू होतात असे कोणतेही इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम यांचा समावेश होत नाही; १९४८ चा ६३. १९५२ चा ३५.

(ङ) "इमारत कामगार" याचा अर्थ, जिला कोणत्याही इमारतीशी किंवा इतर बांधकामविषयक कामाशी संबंधित असलेले कोणतेही कुशल, अर्धकुशल किंवा अकुशल, श्रमाचे, पर्यवेक्षकीय, तांत्रिक किंवा लिपिकीय काम करण्यासाठी मजुरीने किंवा मोबदला देऊन,– मग रोजगाराच्या अटी व्यक्त असो किंवा ध्वनित असो- नोकरीवर ठेवले आहे अशी व्यक्ती, असा आहे परंतु त्यामध्ये,—

(एक) जिला मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय किंवा प्रशासकीय क्षमतेवर नोकरीवर ठेवले आहे; किंवा

(दोन) जी, पर्यवेक्षकीय क्षमतेवर नोकरीवर असताना, दरमहा एक हजार सहाशे रुपयांपेक्षा अधिक वेतन घेते किंवा एकतर तिच्या पदाशी संलग्न असलेल्या कर्तव्यांच्या स्वरुपामुळे किंवा तिच्याकडे निहित असलेल्या अधिकारांच्या कारणाने, मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय स्वरुपाची कार्ये पार पाडते,

अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होत नाही;

(च) "मुख्य निरीक्षक" याचा अर्थ, कलम ४२ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेला मुख्य निरीक्षक, इमारत व बांधकाम निरीक्षण, असा आहे;

(छ) "कंत्राटदार" याचा अर्थ, जी, इमारत कामगारांना नोकरीवर ठेवून त्याद्वारे केवळ निर्मित मालाच्या किंवा वस्तूंच्या पुरवठ्याव्यतिरिक्त, कोणत्याही आस्थापनेसाठी निश्चित परिणाम साध्य करण्याची हमी देते किंवा जी, आस्थापनेचे कोणतेही काम करण्यासाठी इमारत कामगारांचा पुरवठा करते ती व्यक्ती, असा आहे; आणि त्यामध्ये उप-कंत्राटदाराचा समावेश होतो;

(ज) "महासंचालक" याचा अर्थ, कलम ४२ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेला निरीक्षण महासंचालक, असा आहे;

(झ) एखाद्या आस्थापनेच्या संबंधातील "नियोक्ता" याचा अर्थ, त्या आस्थापनेचा मालक, असा आहे, आणि त्यामध्ये,—

(एक) कोणत्याही कंत्राटदाराशिवाय थेट शासनाच्या कोणत्याही विभागाच्या प्राधिकाराद्वारे किंवा त्याअन्वये केलेल्या इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाच्या संबंधात, याबाबतीत विनिर्दिष्ट केलेला प्राधिकारी, किंवा जेव्हा असा कोणताही प्राधिकारी विनिर्दिष्ट केला नसेल तेव्हा, विभाग प्रमुख;

(दोन) कोणत्याही कंत्राटदाराशिवाय थेट स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा इतर आस्थापनेच्याद्वारे किंवा त्यांच्या वतीने केलेल्या इमारत किंवा इतर बांधकामाच्या संबंधात, त्या प्राधिकरणाचा किंवा आस्थापनेचा मुख्य कार्यकारी अधिकारी;

(तीन) एखाद्या कंत्राटदाराद्वारे किंवा त्याच्यामार्फत अथवा एखाद्या कंत्राटदाराने पुरवलेल्या इमारत कामगारांना नोकरीवर ठेवून त्याद्वारे केलेल्या इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाच्या संबंधात, कंत्राटदार,

यांचा समावेश होतो;

(ञ) "आस्थापना" याचा अर्थ, जी किंवा जो, कोणत्याही इमारतीच्या किंवा इतर बांधकामविषयक कामामध्ये इमारत कामगारांना नोकरीवर ठेवतो अशी शासनाची, कोणत्याही निगम निकायाची किंवा भागीदारी संस्थेची, एखाद्या व्यक्तीची, किंवा व्यक्तींच्या संघाची किंवा व्यक्तींच्या इतर निकायाची मालकी असणारी किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणतीही आस्थापना, असा आहे; आणि त्यामध्ये कंत्राटदाराची मालकी असणाऱ्या आस्थापनेचा समावेश होतो, परंतु, जी तिच्या स्वतःच्या निवासस्थानाच्या संबंधात, अशा बांधकामाचा एकूण खर्च दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही इमारतीमध्ये किंवा इतर बांधकाम कामामध्ये अशा कामगारांना नोकरीवर ठेवते, त्या व्यक्तीचा समावेश होत नाही;

(ट) "निधी" याचा अर्थ, कलम २४ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेला इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाचा निधी, असा आहे;

(ठ) "अधिसूचना" याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे;

(ड) "विहित" याचा अर्थ, केंद्र सरकारने, किंवा यथास्थिति, राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

१९३६ चा ४. (ढ) "वेतन" यास, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ याच्या कलम २ च्या खंड (सहा) मध्ये त्याला जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

(२) कोणत्याही क्षेत्रात अंमलात नसलेल्या एखाद्या कायद्याचा या अधिनियमातील कोणत्याही निर्देशाचा, त्या क्षेत्राच्या संबंधातील, त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याचा निर्देश म्हणून अन्वयार्थ लावण्यात येईल.

## प्रकरण दोन

## सल्लागार समित्या व तज्ज्ञ समित्या

**३.** (१) केंद्र सरकार, त्याच्याकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात येतील अशा, या अधिनियमाच्या अंमलबजावणीतून उद्‌भवणाऱ्या बाबींवर केंद्र सरकारला सल्ला देण्यासाठी, केंद्रीय इमारत व इतर बांधकाम कामगार सल्लागार समिती (यात यापुढे जिचा निर्देश, "केंद्रीय सल्लागार समिती" असा केला आहे) म्हणून संबोधली जाणारी एक समिती, शक्य तितक्या लवकर घटित करील. **केंद्रीय सल्लागार समिती.**

(२) केंद्रीय सल्लागार समिती,—

(क) केंद्र सरकारकडून नियुक्त करावयाचा एक अध्यक्ष ;

(ख) संसदेचे तीन सदस्य, त्यांपैकी दोन लोकसभेद्वारे व एक राज्यसभेद्वारे निवडण्यात येतील- सदस्य;

(ग) महासंचालक - सदस्य, पदसिद्ध ;

(घ) नियोक्ते, इमारत कामगार, वास्तुविशारदांचे संघ, अभियंते, अपघात विमा संस्था आणि केंद्र सरकारच्या मते, ज्यांनी केंद्रीय सल्लागार समितीवर प्रतिनिधित्व केले पाहिजे अशा इतर कोणत्याही हितसंबंधित व्यक्ती, यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र सरकार नामनिर्देशित करील असे, तेरापेक्षा अधिक नसतील परंतु, नऊपेक्षा कमी नसतील अशा संख्येतील इतर सदस्य,

यांची मिळून बनलेली असेल.

(३) पोट-कलम (२) च्या खंड (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रवर्गातून सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या, केंद्रीय सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती, त्यांनी आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती, आणि त्यांच्यामधून रिक्त होणाऱ्या जागा भरण्याची रीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेलः

परंतु, इमारत कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्देशित केलेले सदस्य हे, नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा कमी असणार नाहीत.

(४) याद्वारे असे घोषित करण्यात येते की, केंद्रीय सल्लागार समितीच्या सदस्याच्या पदामुळे तिचा धारक, संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यासाठी, किंवा असण्यासाठी, अनर्ह ठरणार नाही.

**राज्य सल्लागार समिती.** ४. (१) राज्य शासन, त्याच्याकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात येतील अशा, या अधिनियमाच्या अंमलबजावणीतून उद्‌भवणाऱ्या बाबींवर राज्य शासनाला सल्ला देण्यासाठी, राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार सल्लागार समिती (यात यापुढे जिचा निर्देश, "राज्य सल्लागार समिती" असा केला आहे) या नावाने संबोधली जाणारी एक समिती घटित करील.

(२) राज्य सल्लागार समिती,—

(क) राज्य शासनाकडून नियुक्त करावयाचा एक अध्यक्ष;

(ख) राज्य विधानमंडळातून निवडून द्यावयाचे राज्य विधानमंडळाचे दोन सदस्य- सदस्य;

(ग) केंद्र सरकारकडून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य;

(घ) मुख्य निरीक्षक - सदस्य, पदसिद्ध;

(ङ) नियोक्ते, इमारत कामगार, वास्तुविशारदांचे संघ, अभियंते, अपघात विमा संस्था आणि राज्य शासनाच्या मते, ज्यांनी राज्य सल्लागार समितीवर प्रतिनिधित्व केले पाहिजे अशा इतर कोणत्याही हितसंबंधित व्यक्ती, यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्य शासन नामनिर्देशित करील असे अकरापेक्षा अधिक नसतील परंतु, सात पेक्षा कमी नसतील अशा संख्येतील इतर सदस्य,

यांची मिळून बनलेली असेल.

(३) पोट-कलम (२) च्या खंड (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रवर्गातून सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या, राज्य सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती, त्यांनी आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती, आणि त्यांच्यामधून रिक्त होणाऱ्या जागा भरण्याची रीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु, इमारत कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्देशित केलेले सदस्य हे, नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा कमी असणार नाहीत.

राज्य सुधारणा

**महाराष्ट्र**

**कलम ४ ची सुधारणा :**

अनाथालये व अन्य धर्मादाय (देखरेख व नियंत्रण), विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण व पूर्ण सहभाग) आणि इमारत व इतर बांधकाम मजूर (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१६ (२०१६ चा महा. ४) याच्या कलम ५ द्वारे, उपरोक्त कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये खंड (ख ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात आला :—

" (ख) राज्य विधानमंडळाचे दोन सदस्य, त्यांपैकी एक सदस्य, राज्य विधानसभेचा अध्यक्ष राज्य विधानसभा सदस्यांमधून आणि एक सदस्य राज्य विधानपरिषदेचा सभापती राज्य विधानपरिषद सदस्यांमधून नामनिर्देशित करील ... सदस्य ;".

**तज्ज्ञ समित्या.**

**५.** (१) समुचित शासनास, या अधिनियमाखाली नियम करण्यासाठी त्या शासनाला सल्ला देण्याकरिता, इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामातील विशेष अर्हताप्राप्त व्यक्तींचा समावेश असलेली एक किंवा त्यापेक्षा अधिक तज्ज्ञ समित्या घटित करता येतील.

(२) तज्ज्ञ समितीच्या सदस्यांना, समितीच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्याकरिता, विहित करण्यात येईल असे वेतन व भत्ते प्रदान करण्यात येतील:

परंतु, जो शासनाचा किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्यान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही निगम निकायाचा अधिकारी आहे अशा सदस्याला कोणतेही वेतन किंवा भत्ते प्रदेय असणार नाहीत.

## प्रकरण तीन

## आस्थापनांची नोंदणी

**नोंदणी अधिकाऱ्यांची नेमणूक.**

**६.** समुचित शासनास, **राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे,—

(क) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, शासनाला योग्य वाटतील अशा, शासनाच्या राजपत्रित अधिकारी असणाऱ्या व्यक्तींची नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल; आणि

(ख) ज्या सीमेच्या आतमध्ये एखादा नोंदणी अधिकारी या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करील त्या सीमा निश्चित करता येतील.

**आस्थापनांची नोंदणी.**

**७.** (१) प्रत्येक नियोक्ता,—

(क) या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर ज्या आस्थापनेला तो लागू होतो त्या आस्थापनेच्या संबंधात, अशा प्रारंभापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत; आणि

(ख) अशा प्रारंभानंतर कोणत्याही वेळी हा अधिनियम जिला लागू होईल, अशा इतर कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात, हा अधिनियम, ज्या दिनांकास अशा आस्थापनेला लागू होतो, त्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत, अशा आस्थापनेची नोंदणी करण्यासाठी, नोंदणी अधिकाऱ्याकडे अर्ज करील :

परंतु, जर अशा कालावधीच्या आत पुरेशा कारणामुळे अर्ज करण्यापासून अर्जदारास प्रतिबंध झाला होता याबाबत नोंदणी अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, त्याला, उपरोक्त कालावधी संपल्यानंतर असा कोणताही अर्ज दाखल करून घेता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात करण्यात येईल आणि अशा तपशिलांचा त्यात अंतर्भाव असेल व असे शुल्क त्यासोबत असेल.

(३) पोट-कलम (१) खाली अर्ज प्राप्त झाल्यानंतर, नोंदणी अधिकारी, आस्थापनेची नोंदणी करील आणि विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात व अशा वेळेत आणि अशा शर्तींना अधीन राहून तिच्या नियोक्त्याला नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(४) जेव्हा, या कलमाखाली एखाद्या आस्थापनेची नोंदणी झाल्यानंतर, अशा आस्थापनेच्या बाबतीतील मालकी किंवा व्यवस्थापन किंवा अन्य विहित तपशील यांमध्ये कोणताही बदल घडून आला असेल त्या बाबतीत, नियोक्त्याकडून, अशा बदलांच्या संबंधातील तपशील, असा बदल झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, नोंदणी अधिकाऱ्याला कळविण्यात येतील.

**विवक्षित प्रकरणी नोंदणी रद्द करणे.**

८. नोंदणी अधिकाऱ्याची, एकतर याबाबतीत त्याच्याकडे केलेल्या निर्देशावरून किंवा अन्यथा, कोणत्याही आस्थापनेची नोंदणी, विपर्यास करून किंवा कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती दडवून मिळवली आहे अथवा अशा आस्थापनेने केलेल्या कोणत्याही कामाच्या संबंधात या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन केले नाही, किंवा इतर कोणत्याही कारणामुळे नोंदणी निरुपयोगी किंवा निष्फळ ठरली आहे याबाबत खात्री पटली असेल आणि म्हणून, ती रद्द करण्याची आवश्यकता वाटत असेल तर, त्यास, आस्थापनेच्या नियोक्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, ती नोंदणी रद्द करता येईल.

**अपील.**

९. (१) कलम ८ अन्वये दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला ज्या दिनांकास आदेश कळविण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, अपील अधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल, जी समुचित शासनाने याबाबतीत नामनिर्देशित केलेली व्यक्ती असेल :

परंतु, पुरेशा कारणामुळे अपील दाखल करण्यापासून अपीलकर्त्यास प्रतिबंध झाला होता याबाबत अपील अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, त्यास, उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अपील प्राप्त झाल्यावर, अपील अधिकारी, अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, शक्य तितक्या शीघ्रतेने, रद्द करण्याचा आदेश कायम करील, त्यात फेरबदल करील किंवा तो फिरवील.

**नोंदणी न करण्याचा परिणाम.**

१०. जिला हा अधिनियम लागू होतो अशा आस्थापनेचा कोणताही नियोक्ता,—

(क) कलम ७ अन्वये नोंदणी करण्याची आवश्यकता असलेल्या, परंतु त्या कलमान्वये नोंदणी करण्यात न आलेल्या आस्थापनेच्या बाबतीत;

(ख) जिच्या बाबतीत कलम ८ अन्वये नोंदणी रद्द करण्यात आली असेल आणि अशा रद्द केल्याच्या आदेशाविरुद्ध, असे अपील दाखल करण्यासाठी विहित केलेल्या कालावधीत कलम ९ अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले नसेल किंवा जेव्हा अशा प्रकारे अपील दाखल करण्यात आले असेल तेव्हा असे अपील खारीज करण्यात आले असेल, अशा आस्थापनेच्या बाबतीत,

कलम ७ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर, किंवा कलम ८ अन्वये नोंदणी रद्द केल्यानंतर किंवा कलम ९ अन्वये अपील दाखल करण्याचा कालावधी संपल्यानंतर किंवा, यथास्थिति, अपील खारीज केल्यानंतर, आस्थापनेत इमारत कामगारांना नोकरीवर ठेवणार नाही.

## प्रकरण चार

## इमारत कामगारांची लाभार्थी म्हणून नोंदणी.

**११.** या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, या अधिनियमाखाली लाभार्थी म्हणून नोंदणी केलेला प्रत्येक इमारत कामगार, मंडळाने या अधिनियमाखालील त्याच्या निधीमधून तरतूद केलेले लाभ मिळण्यास हक्कदार असेल. **निधीचे लाभार्थी.**

**१२.** (१) ज्याने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली आहेत परंतु वयाची साठ वर्षे पूर्ण केलेली नाहीत, आणि जो पूर्ववर्ती बारा महिन्यांमध्ये नव्वद दिवसांपेक्षा कमी नसेल इतके दिवस कोणत्याही इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामांमध्ये काम करीत असेल असा प्रत्येक इमारत कामगार, या अधिनियमाखालील लाभार्थी म्हणून नोंदणी करण्यासाठी पात्र असेल. **इमारत कामगारांची लाभार्थी म्हणून नोंदणी.**

(२) नोंदणीचा अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, याबाबत मंडळाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) खालील प्रत्येक अर्जासोबत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा शुल्कासह, असे दस्तऐवज जोडण्यात येतील.

(४) अर्जदाराने या अधिनियमाच्या तरतुदींचे व त्याखाली केलेल्या नियमांचे अनुपालन केले आहे याबाबत पोट-कलम (२) अन्वये मंडळाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, तो, या अधिनियमाखालील लाभार्थी म्हणून इमारत कामगाराचे नाव नोंदवीलः

परंतु, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय, नोंदणी अर्ज फेटाळला जाणार नाही.

(५) पोट-कलम (४) खालील निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, मंडळाच्या सचिवाकडे किंवा याबाबतीत मंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील, सचिवाचा किंवा अशा अन्य अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, इमारत कामगाराला पुरेशा कारणांमुळे वेळेत अपील दाखल करण्यापासून प्रतिबंध झाला होता याबाबत सचिवाची किंवा त्याबाबतीत मंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, त्यास, उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.

(६) मंडळाचा सचिव, विहित करण्यात येतील अशा नोंदवह्या ठेवण्याची व्यवस्था करील.

**१३.** (१) मंडळ, प्रत्येक लाभार्थ्याला, त्याचे यथोचितरीत्या छायाचित्र चिकटवलेले आणि त्याने केलेल्या इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामांच्या तपशिलांची नोंद करण्यासाठी पुरेशी जागा असलेले एक ओळखपत्र देईल. **ओळखपत्रे.**

(२) प्रत्येक नियोक्ता, लाभार्थ्याने केलेल्या इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाच्या तपशिलांची ओळखपत्रात नोंद करील व ते अधिप्रमाणित करील आणि ते ओळखपत्र लाभार्थ्याला परत देईल.

(३) ज्याला या अधिनियमाखाली ओळखपत्र देण्यात आले आहे असा लाभार्थी, शासनाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून, कोणत्याही निरीक्षकाकडून किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून तपासणीसाठी जेव्हा जेव्हा मागणी करण्यात येईल तेव्हा ते सादर करील.

**१४.** (१) ज्याची या अधिनियमाखाली लाभार्थी म्हणून नोंदणी झालेली आहे असा इमारत कामगार, जेव्हा तो वयाची साठ वर्षे पूर्ण करील तेव्हा किंवा जेव्हा त्याने एखाद्या वर्षात नव्वद दिवसांपेक्षा कमी नसेल इतके दिवस इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम केले नसेल तेव्हा, असा लाभार्थी असण्याचे बंद होईल : **लाभार्थी असण्याचे बंद होणे.**

परंतु, या पोट-कलमाखालील नव्वद दिवसांच्या कालावधीची गणना करताना, इमारत कामगारास, त्याच्या रोजगारातून आणि रोजगाराच्या ओघात उद्‌भवणाऱ्या अपघातामुळे त्याला झालेल्या कोणत्याही वैयक्तिक इजेमुळे इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामातील अनुपस्थितीचा कोणताही कालावधी वगळण्यात येईल.

( २ ) पोट-कलम ( १ ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर एखादी व्यक्ती, वयाची साठ वर्षे पूर्ण होण्याच्या लगतपूर्वी किमान सलग तीन वर्षे लाभार्थी राहिलेली असेल तर, ती विहित करण्यात येतील असे लाभ मिळण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमान्वये एखाद्या मंडळाचा लाभार्थी म्हणून तीन वर्षांच्या कालावधीची गणना करताना, एखादी व्यक्ती, तिच्या नोंदणीच्या लगतपूर्वी ज्या कालावधीसाठी इतर कोणत्याही मंडळाची लाभार्थी राहिलेली होती अशा कोणत्याही कालावधीची त्यात भर घालण्यात येईल.

**लाभार्थ्यांची नोंदवही.**

**१५.** प्रत्येक नियोक्ता, त्याने हाती घेतलेल्या इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामावर नोकरीवर ठेवलेल्या लाभार्थ्यांच्या रोजगाराचे तपशील दर्शविणारी नोंदवही, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात ठेवील आणि मंडळाच्या सचिवास किंवा याबाबतीत मंडळाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास कोणतीही पूर्व सूचना न देता, तिची तपासणी करता येईल.

**इमारत कामगारांचे अंशदान.**

**१६.** ( १ ) या अधिनियमाखाली लाभार्थी म्हणून ज्याची नोंदणी झालेली आहे असा इमारत कामगार, वयाची साठ वर्षे पूर्ण होईपर्यंत, राज्य शासनाकडून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने, दरमहा निधीत अंशदान देईल आणि इमारत कामगारांच्या वेगवेगळ्या वर्गांसाठी अंशदानाचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील :

परंतु, एखादा लाभार्थी, कोणत्याही आर्थिक अडचणीमुळे त्याचे अंशदान प्रदान करण्यास असमर्थ आहे याबाबत मंडळाची खात्री पटली असेल तर, त्यास, एका वेळी, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी अंशदानाच्या प्रदानातून सूट देता येईल.

( २ ) लाभार्थ्यास, त्याच्या मासिक वेतनातून त्याच्या अंशदानाची कपात करण्यासाठी आणि अशी कपात केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, त्याचा मंडळाकडे भरणा करण्यासाठी त्याच्या नियोक्त्याला प्राधिकृत करता येईल.

**अंशदानाचा भरणा न केल्याचा परिणाम.**

**१७.** जेव्हा लाभार्थ्याने, एका वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या सलग कालावधीसाठी कलम १६ च्या पोट-कलम ( १ ) खालील त्याचे अंशदान प्रदान केले नसेल तेव्हा, तो लाभार्थी असण्याचे बंद होईल :

परंतु, अंशदान प्रदान न करण्यास वाजवी कारण होते आणि इमारत कामगाराची थकबाकी जमा करण्याची इच्छा आहे याबाबत मंडळाच्या सचिवाची खात्री पटली असेल तर, तो, इमारत कामगाराला थकीत अंशदान जमा करण्याची मुभा देऊ शकेल आणि असे अंशदान जमा केल्यावर, इमारत कामगाराची नोंदणी पुनर्स्थापित होईल.

## प्रकरण पाच

## इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळे

**राज्य कल्याण मंडळे घटित करणे.**

**१८.** (१) प्रत्येक राज्य शासन, या अधिनियमाखाली प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकापासून ....... ( राज्याचे नाव) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ म्हणून ओळखले जाणारे एक मंडळ घटित करील.

( २ ) मंडळ, शाश्वत उत्तराधिकार व सामायिक मोहोर असलेला उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल आणि उक्त नावाने त्याला दावा दाखल करता येईल किंवा त्याच्या विरुध्द दावा दाखल करता येईल.

(३) मंडळ, एक अध्यक्ष, केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाची एक व्यक्ती आणि राज्य शासनाकडून त्यावर नियुक्त करता येतील असे पंधरापेक्षा अधिक नसतील अशा संख्येतील इतर सदस्य यांचे मिळून बनलेले असेल :

परंतु, मंडळामध्ये, राज्य शासन, नियोक्ते व इमारत कामगार यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या समसमान संख्येतील सदस्यांचा समावेश असेल आणि मंडळाची किमान एक सदस्य ही, महिला असेल.

(४) मंडळाचा अध्यक्ष व अन्य सदस्य यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती आणि त्यांना प्रदेय असलेले वेतन व अन्य भत्ते, आणि मंडळाच्या सदस्यांच्या नैमित्तिक रिक्त जागा भरण्याची रीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**मंडळाचे सचिव व अन्य अधिकारी.**

**१९.** (१) मंडळ, या अधिनियमांखालील त्याची कार्ये कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी त्यास इष्ट वाटत असेल, असा एक सचिव व असे अन्य अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करील.

(२) मंडळाचा सचिव हा, त्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल.

(३) मंडळाचा सचिव आणि अन्य अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती आणि त्यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**मंडळाच्या बैठकी.**

**२०.** (१) मंडळ, विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईल आणि त्याच्या बैठकींतील कामकाज चालवण्याच्या संबंधातील कार्यपध्दतीच्या अशा नियमांचे (अशा बैठकीच्या गणपूर्तीसह) पालन करील.

(२) अध्यक्ष किंवा, जर तो कोणत्याही कारणास्तव मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहण्यास असमर्थ असेल तर, याबाबतीत अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला कोणताही सदस्य आणि अशा नामनिर्देशनाच्या अभावी, बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेला अन्य कोणताही सदस्य, बैठकीचे अध्यक्षपद स्वीकारील.

(३) मंडळाच्या कोणत्याही बैठकीसमोर येतील अशा सर्व प्रश्नांवर, उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय करण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास, अध्यक्षाला किंवा त्याच्या अनुपस्थितीत, अध्यक्षस्थानी असणाऱ्या व्यक्तीला, दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

**रिक्तपदे, इत्यादीमुळे मंडळाची कार्यवाही विधिअग्राह्य नसणे.**

**२१.** मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही,—

(क) मंडळात कोणतेही पद रिक्त असणे, किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असणे; किंवा

(ख) मंडळाचा सदस्य म्हणून कार्यरत असणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीमध्ये कोणताही दोष असणे; किंवा

(ग) प्रकरणाच्या गुणावगुणास बाधक न ठरणारी मंडळाच्या कार्यवाहीत कोणतीही अनियमितता असणे,

केवळ या कारणामुळे विधिअग्राहय ठरणार नाही.

**मंडळांची कार्ये.**

**२२.** (१) मंडळास,—

(क) अपघात झाल्यास लाभार्थ्याला तात्काळ सहाय्य करता येईल;

(ख) ज्यांनी वयाची साठ वर्षे पूर्ण केलेली आहेत अशा लाभार्थ्यांना निवृत्तिवेतन प्रदान करता येईल ;

(ग) लाभार्थ्यास घर बांधण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा जास्त असणार नाही अशी आणि अशा अटींवर व शर्तींवर कर्जे किंवा अग्रिमे मंजूर करता येतील;

(घ) लाभार्थ्यांच्या गट विमा योजनेच्या हफ्त्यांच्या संबंधात, त्यास योग्य वाटेल अशी रक्कम प्रदान करता येईल ;

(ङ) लाभार्थ्यांच्या बालकांच्या शिक्षणासाठी, विहित करण्यात येईल असे वित्तीय सहाय्य देता येईल;

(च) लाभार्थ्याच्या किंवा, अशा अवलंबिताच्या मोठ्या आजारांवरील उपचारांकरिता विहित करण्यात येईल अशा वैद्यकीय खर्चाची पूर्तता करता येईल ;

(छ) महिला लाभार्थ्यांना प्रसूतीविषयक लाभाचे प्रदान करता येईल ; आणि

(ज) विहित करण्यात येतील अशा अन्य कल्याणकारी उपाययोजना व सुविधा यांची तरतूद करता येईल आणि त्यात सुधारणा करता येईल.

(२) मंडळास, कोणत्याही आस्थापनेतील इमारत कामगारांच्या कल्याणाशी संबंधित असलेल्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही योजनेच्या मदतीने स्थानिक प्राधिकरणाला किंवा नियोक्त्याला कर्ज किंवा अर्थसहाय्य देता येईल.

(३) मंडळास, जे स्थानिक प्राधिकरण किंवा जो नियोक्ता, इमारत कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या लाभासाठी, मंडळाने विर्निर्दिष्ट केलेल्या दर्जाच्या कल्याणकारी उपाययोजना व सुविधा, मंडळाचे समाधान होईल तितपत पुरवितात त्या स्थानिक प्राधिकरणाला किंवा नियोक्त्याला दरवर्षी सहायक अनुदान प्रदान करता येईल, तथापि, असे की, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला किंवा नियोक्त्याला सहायक अनुदान म्हणून प्रदेय असलेली रक्कम,—

(क) राज्य शासनाने किंवा याबाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने निर्धारित केलेल्या अशा कल्याणकारी उपाययोजना व सुविधा पुरवण्यासाठी खर्च केलेली रक्कम, किंवा

(ख) विहित करण्यात येईल अशी रक्कम,

यांपैकी जी कमी असेल, त्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, जेव्हा, कल्याणकारी उपाययोजना व सुविधा यांवर उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेली, खर्च केलेली रक्कम, याबाबतीत विहित केलेल्या रकमेपेक्षा कमी असेल त्याबाबतीत, अशा कोणत्याही कल्याणकारी उपाययोजना व सुविधा यांच्या बाबतीत कोणतेही सहायक अनुदान प्रदेय असणार नाही.

**केंद्र सरकारकडून अनुदाने व कर्जे.**

**२३.** केंद्र सरकारला, याबाबतीत कायद्याद्वारे संसदेने केलेल्या यथोचित विनियोजनानंतर, सरकारला आवश्यक वाटेल अशा पैशाच्या स्वरूपातील रकमांची अनुदाने व कर्जे मंडळास देता येतील.

**इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण निधी आणि त्याचे उपयोजन.**

**२४.** (१) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण निधी या नावाने संबोधला जाणारा एक निधी मंडळाकडून घटित करण्यात येईल आणि त्यामध्ये,—

(क) कलम २३ अन्वये केंद्र सरकारने, मंडळाला दिलेली कोणतीही अनुदाने व कर्जे ;

(ख) लाभार्थ्यांनी दिलेली सर्व अंशदाने;

(ग) केंद्र सरकारकडून ठरविण्यात येईल अशा इतर स्त्रोतांमधून मंडळाला मिळालेल्या सर्व रकमा,

जमा करण्यात येतील.

(२) निधीचे उपयोजन,—

(क) कलम २२ खालील मंडळाची कार्ये पार पाडताना त्याचा होणारा खर्च; आणि

(ख) मंडळाचे सदस्य, अधिकारी व अन्य कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व अन्य पारिश्रमिक;

(ग) या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेल्या उद्दिष्टांवर आणि त्या प्रयोजनार्थ होणारा खर्च,

भागविण्यासाठी करण्यात येईल.

(३) कोणतेही मंडळ, कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये, त्याचे सदस्य, अधिकारी व अन्य कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व अन्य पारिश्रमिक यांसाठी आणि अन्य प्रशासकीय खर्च भागवण्यासाठी, त्या आर्थिक वर्षातील त्याच्या एकूण खर्चाच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक खर्च करणार नाही.

**२५.** मंडळ, मंडळाच्या अंदाजित जमा रकमा व खर्च दर्शवणारा, पुढील आर्थिक वर्षाचा त्याचा अर्थसंकल्प, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व प्रत्येक आर्थिक वर्षात अशा वेळी, तयार करील आणि तो राज्य शासनाला व केंद्र सरकारला पाठवील. **अर्थसंकल्प.**

**२६.** मंडळ, मागील आर्थिक वर्षामधील त्याचा कार्याचा संपूर्ण लेखाजोखा देणारा, त्याचा वार्षिक अहवाल, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व प्रत्येक आर्थिक वर्षात अशा वेळी तयार करील आणि त्याची एक प्रत, राज्य शासनाला व केंद्र सरकारला पाठवील. **वार्षिक अहवाल.**

**२७.** (१) मंडळ, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याशी विचारविनिमय करून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, यथोचित लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील. **लेखे व लेखापरीक्षा.**

(२) भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकास किंवा या अधिनियमाखाली मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात त्याने नियुक्त केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीस, भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकाला शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात जे हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतात तेच हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार, अशी लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात असतील आणि विशेषतः, या अधिनियमाखालील मंडळाची पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके व इतर दस्तऐवज आणि कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा आणि कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(३) मंडळाच्या लेख्यांची, भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकाकडून दरवर्षी लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात केलेला कोणताही खर्च, मंडळाकडून भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकाला प्रदेय असेल.

(४) मंडळ, लेखापरीक्षा केलेल्या लेख्यांची एक प्रत लेखापरीक्षकाच्या अहवालासह, विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी राज्य शासनाला सादर करील.

(५) राज्य शासन, वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकाचा अहवाल मिळाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, तो, राज्य विधानमंडळासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण सहा

## इमारत कामगारांचे कामाचे तास, कल्याणकारी उपाययोजना आणि इतर सेवाशर्ती

**२८.** (१) समुचित शासनास, नियमांद्वारे,— **सामान्य कामाच्या दिवसाचे तास निश्चित करणे, इत्यादी.**

(क) ज्यायोगे एक किंवा अधिक विनिर्दिष्ट मध्यंतर समाविष्ट करून एखाद्या इमारत कामगारासाठी सामान्य कामाचा दिवस घटित होईल अशी कामाच्या तासांची संख्या निश्चित करता येईल.

(ख) प्रत्येक सात दिवसांच्या कालावधीमध्ये एका विश्रांतीच्या दिवसाची तरतूद करता येईल, जो सर्व इमारत कामगारांसाठी आणि अशा विश्रांतीच्या दिवसांच्या बाबतीत पारिश्रमिक प्रदान करण्यासाठी अनुज्ञेय असेल;

(ग) कलम २९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अतिकालिक दरापेक्षा कमी नसलेल्या दराने विश्रांतीच्या दिवशी केलेल्या कामाचे वेतन प्रदान करण्याची तरतूद करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी, इमारत कामगारांच्या पुढील वर्गांच्या संबंधात केवळ, विहित करण्यात येतील अशा मर्यादेपर्यंत व अशा शर्तींना अधीन राहून, लागू होतील :—

(क) तातडीच्या कामावर, किंवा जिचा पूर्वअंदाज करता येऊ शकत नाही किंवा जिला प्रतिबंध करता येऊ शकत नाही अशा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमध्ये कामावर लावलेल्या व्यक्ती ;

(ख) जे काम नियमांमध्ये निर्धारित केलेल्या कामाच्या सामान्य वेळेपेक्षा अधिक वेळेत पार पाडणे आवश्यक आहे अशा पूर्वतयारीच्या किंवा पूरक स्वरूपाच्या कामावर लावलेल्या व्यक्ती;

(ग) जे काम तांत्रिक कारणामुळे दिवस संपण्यापूर्वी पूर्ण करावयाचे आहे अशा कोणत्याही कामावर लावलेल्या व्यक्ती;

(घ) जे काम, नैसर्गिक आपत्तीच्या अनियमित घटनांवर अवलंबून असलेली परिस्थिती खेरीज करून पार पाडले जाऊ शकणार नाही अशा एखाद्या कामावर लावलेल्या व्यक्ती;

**अतिकालिक कामाचे वेतन.**

**२९.** (१) जेव्हा कोणत्याही इमारत कामगाराला, सामान्य कामाचा दिवस घटित होणाऱ्या तासांच्या संख्येपेक्षा अधिक तास काम करण्याची आवश्यकता असेल त्याबाबतीत, तो त्याच्या वेतनाच्या सर्वसाधारण दरापेक्षा दुप्पट दराने वेतन मिळण्यास हक्कदार असेल.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, "वेतनांचे सर्वसाधारण दर" याचा अर्थ, कामगार त्या त्या वेळी मिळण्यास हक्कदार असेल असे मूळ वेतन, अधिक भत्ते, असा आहे, परंतु, त्यामध्ये कोणत्याही बोनसचा समावेश होत नाही.

**नोंदवह्या व अभिलेख ठेवणे.**

**३०.** (१) प्रत्येक नियोक्ता, त्याने कामावर ठेवलेल्या इमारत कामगारांच्या बाबतीत, त्यांनी केलेले काम, ज्यायोगे त्यांचा सामान्य कामाचा दिवस घटित होईल त्या कामाच्या तासांची संख्या, ज्या दिवशी त्यांना विश्रांती घेण्याची मुभा देण्यात येईल तो सात दिवसांच्या प्रत्येक कालावधीतील विश्रांतीचा एक दिवस, त्यांना प्रदान केलेले वेतन, त्यांनी दिलेल्या पावत्या आणि असा इतर तपशील दर्शविणाऱ्या नोंदवह्या व अभिलेख, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात ठेवील.

(२) प्रत्येक नियोक्ता, विहित केलेल्या तपशिलांचा अंतर्भाव असणाऱ्या विहित नमुन्यातील नोटिसा, जेथे अशा कामगारांना नोकरीवर ठेवता येईल त्या ठिकाणी, विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्रदर्शित करील.

(३) समुचित शासनास, एखाद्या आस्थापनेत नोकरीवर ठेवलेल्या इमारत कामगारांना वेतन पुस्तके किंवा वेतन चिठ्ठ्या देण्यासाठी, आणि अशा वेतन पुस्तकांमध्ये किंवा वेतन चिठ्ठ्यांमध्ये नियोक्त्याकडून किंवा त्याच्या अभिकर्त्याकडून ज्या रीतीने नोंदी करण्यात येतील व अधिप्रमाणित करण्यात येतील ती रीत विहित करण्यासाठी नियमांद्वारे तरतूद करता येईल.

**विवक्षित इमारत व इतर बांधकामविषयक कामावर विवक्षित व्यक्तींना नोकरीवर ठेवण्यास मनाई असणे.**

**३१.** नियोक्त्याला ज्या व्यक्तीविषयी, ती कर्ण बधिर आहे किंवा तिची सदोष दृष्टी आहे किंवा तिला भोवळ येण्याची प्रवृत्ती आहे, अशी माहिती असेल किंवा तसा विश्वास ठेवण्यास कारण असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीस, ज्या कामामुळे एकतर स्वतः त्या इमारत कामगाराला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही अपघाताची जोखीम होण्याचा संभव आहे अशा कोणत्याही इमारतीच्या निर्माण कार्यामध्ये किंवा इतर बांधकाम कामामध्ये काम करण्यास भाग पाडले जाणार नाही किंवा मुभा दिली जाणार नाही.

**पिण्याचे पाणी.**

**३२.** (१) नियोक्ता, जेथे इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम सुरू असेल अशा प्रत्येक ठिकाणी, नोकरीवर ठेवलेल्या सर्व व्यक्तींसाठी सोयीस्कर असलेल्या योग्य जागी, आरोग्यप्रद पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा करण्याची तरतूद करण्याकरिता आणि तो सुस्थितीत ठेवण्याकरिता प्रभावी व्यवस्था करील.

(२) अशा सर्व जागी, अशा ठिकाणी नोकरीस असलेल्या बहुसंख्य व्यक्तींना समजेल अशा भाषेत "पिण्याचे पाणी" असा मजकूर सुवाच्यपणे लिहिण्यात येईल आणि अशी कोणतीही जागा ही, कोणतेही धुलाईचे ठिकाण, मुतारी किंवा शौचालय यांपासून सहा मीटरच्या आत स्थित असणार नाही.

**३३.** जेथे इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम चालू आहे अशा प्रत्येक ठिकाणी, नियोक्ता, विहित करण्यात येईल अशा प्रकाराच्या शौचालयाची व मुतारीची पुरेशी व्यवस्था करील आणि जेव्हा इमारत कामगार अशा ठिकाणी असतील अशा सर्व वेळी, त्यांना सहजपणे ये-जा करता येईल अशा सोयीस्कर ठिकाणी त्या असतील : **शौचालये व मुताऱ्या.**

परंतु, जेथे पन्नासपेक्षा कमी व्यक्ती नोकरीवर ठेवलेल्या असतील किंवा जेथे शौचालये जलवाहित मलप्रणालीशी जोडलेली असतील, अशा कोणत्याही ठिकाणी, स्वतंत्र मुताऱ्यांची तरतूद करण्याची आवश्यकता असणार नाही.

**३४.** (१) नियोक्ता, इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम चालू असेल अशा कालावधीत त्याने नोकरीवर ठेवलेल्या सर्व इमारत कामगारांसाठी मोफत आणि कार्यस्थळी किंवा शक्य असेल तेथवर, त्या कार्यस्थळाच्या जवळ तात्पुरत्या राहण्याच्या निवासव्यवस्थेची तरतूद करील. **निवासव्यवस्था.**

(२) पोट-कलम (१) अन्वये तरतूद केलेल्या तात्पुरत्या निवासस्थानी, स्वतंत्र स्वयंपाकाची जागा, अंघोळीच्या, धुण्याच्या व शौचालयाच्या सुविधा असतील.

(३) इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम पूर्ण झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, नियोक्ता, त्याच्या स्वखर्चाने, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, इमारत कामगारांना, राहण्यासाठी निवासव्यवस्था, स्वयंपाकाची जागा किंवा इतर सुविधा पुरविण्याच्या प्रयोजनार्थ त्याने उभारलेल्या तात्पुरत्या संरचना काढून टाकण्याची किंवा त्या पाडून टाकण्याची व्यवस्था करील आणि ती जागा पूर्ववत सपाट व स्वच्छ स्थितीत करील.

(४) या कलमान्वये, इमारत कामगारांना तात्पुरती निवासव्यवस्था पुरवण्याच्या प्रयोजनासाठी, नगरपालिका मंडळाने किंवा इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने कोणतीही जमीन नियोक्त्याला दिली असेल त्याबाबतीत, तो, बांधकामविषयक काम पूर्ण झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, त्याला अशी जमीन ज्या स्थितीत मिळाली होती त्याच स्थितीत त्या जमिनीचा ताबा परत करील.

**३५.** (१) जेथे सर्वसाधारणपणे पन्नासपेक्षा अधिक महिला इमारत कामगार नोकरीवर असतील त्या प्रत्येक ठिकाणी, अशा महिला कामगारांच्या सहा वर्षांच्या आतील बालकांच्या वापराकरिता सुयोग्य खोली किंवा खोल्या पुरवण्यात येतील व त्यांची देखभाल करण्यात येईल. **पाळणाघरे.**

(२) अशा खोल्यांमध्ये, -

(क) पुरेशा निवासव्यवस्थेची तरतूद असेल;

(ख) पुरेसा प्रकाश व वायुवीजन करण्यात येईल;

(ग) त्या स्वच्छ व आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यात येतील;

(घ) बालकांची व तान्ह्या मुलांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित महिला असतील.

**३६.** प्रत्येक नियोक्ता, जेथे इमारत बांधकाम किंवा इतर बांधकामविषयक काम चालू असेल अशा सर्व ठिकाणी, विहित करण्यात येतील अशा प्रथमोपचाराच्या सुविधांची तरतूद करील. **प्रथमोपचार.**

**३७.** समुचित शासनास, नियमांद्वारे, नियोक्त्याला,— **आहारगृह, इत्यादी.**

(क) जेथे सर्वसाधारणपणे दोनशे पन्नासपेक्षा कमी नसतील इतके इमारत कामगार नोकरीवर ठेवलेले असतील तेथे, त्या कामगारांच्या वापरासाठी एक आहारगृह पुरविण्यास व ते चालविण्यास ;

(ख) इमारत कामगारांच्या लाभासाठी विहित करण्यात येतील अशा इतर कल्याणकारी उपाययोजनांची तरतूद करण्यास,

भाग पाडता येईल.

## प्रकरण सात

## सुरक्षा व आरोग्यविषयक उपाययोजना

**सुरक्षा समिती व सुरक्षा अधिकारी.**

**३८.** (१) जेथे साधारणपणे पाचशे किंवा त्यापेक्षा अधिक इमारत कामगार नोकरीवर ठेवले असतील अशा प्रत्येक आस्थापनेत, नियोक्ता राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा संख्येतील, नियोक्त्याच्या व इमारत कामगारांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली एक सुरक्षा समिती घटित करील :

परंतु, कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तींची संख्या, कोणत्याही परिस्थितीत, नियोक्त्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तींपेक्षा कमी असणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक आस्थापनेत, नियोक्ता, सुरक्षा अधिकाऱ्याची देखील नियुक्ती करील, जो, विहित करण्यात येतील अशा अर्हता धारण करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

**विवक्षित अपघातांची नोटीस.**

**३९.** (१) जेव्हा अशा कोणत्याही आस्थापनेत अपघात घडतो, त्या अपघातामुळे मृत्यू झाला असेल किंवा त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला कोणतीही शारीरिक इजा झाली असेल त्या कारणामुळे, इजा झालेल्या व्यक्तीला अपघातानंतर तात्काळ अठ्ठेचाळीस तासांच्या किंवा त्यापेक्षा अधिक तासांच्या कालावधीसाठी काम करण्यापासून प्रतिबंध झाला असेल किंवा तो, विहित करण्यात येईल अशा स्वरुपाचा असेल त्याची त्या बाबतीत, नियोक्ता, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळेत अशा प्राधिकरणाला त्याची लेखी नोटीस देईल.

(२) पोट-कलम (१) खालील नोटीस मिळाल्यावर, त्या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणास, त्याला योग्य वाटेल, असे अन्वेषण व अशी चौकशी करता येईल.

(३) जेव्हा पोट-कलम (१) खाली दिलेली नोटीस ही, पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा मृत्यू झालेल्या अपघाताशी संबंधित असेल त्या बाबतीत, प्राधिकरण, नोटीस मिळाल्यापासून एका महिन्याच्या आत, अशा अपघाताची चौकशी करील.

**इमारत कामगारांची सुरक्षा व आरोग्य यांसाठी नियम करण्याचा समुचित शासनाचा अधिकार.**

**४०.** (१) समुचित शासनास इमारत कामगारांच्या नोकरीच्या ओघात, त्यांची सुरक्षा व आरोग्य यांसाठी हाती घ्यावयाच्या उपाययोजना आणि अशा नोकरीच्या कालावधीत त्यांची सुरक्षा, आरोग्य व संरक्षण यांची सुनिश्चिती करण्यासाठी त्यांना पुरवण्याची आवश्यकता असलेली साधन सामग्री व उपकरणे यांच्या संबंधात अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल, जसे की,—

(क) जेव्हा जमिनीवरून किंवा इमारतीच्या कोणत्याही भागावरून किंवा शिडीवरून किंवा आधाराच्या अशा इतर साधनांवरून सुरक्षितपणे काम केले जाऊ शकत नसेल तेव्हा अशा वेगवेगळ्या टप्प्यांवर योग्य व पुरेशा परांची उभारण्याची तरतूद करण्यासह कामाच्या कोणत्याही ठिकाणी ये-जा करण्याची सुरक्षित साधने आणि त्या ठिकाणची सुरक्षितता;

(ख) सक्षम व्यक्तीच्या पर्यवेक्षणाखाली एखाद्या इमारतीचा किंवा इतर संरचनेचा संपूर्ण किंवा कोणताही महत्त्वाचा भाग पाडून टाकण्याच्या आणि सांगाडा असलेल्या इमारतीचा किंवा इतर संरचनेचा कोणताही भाग काढून टाकते वेळी, कोणत्याही इमारतीला किंवा इतर संरचनेला टेकू देऊन किंवा अन्यथा ती कोसळण्यापासूनचा धोका टाळण्याच्या संबंधात घ्यावयाची खबरदारी;

(ग) सक्षम व्यक्तींच्या नियंत्रणाखाली स्फोटकांची हाताळणी करणे किंवा त्यांचा वापर करणे, जेणेकरून स्फोटापासून किंवा उडणाऱ्या साधनांपासून इजा होण्याचा धोका होणार नाही;

(घ) रेल्वे इंजिन, मालमोटारी, मालडबे व इतर वाहने आणि अनुयाने यांसारख्या वाहतूक यंत्रांची उभारणी, त्यांची मांडणी, त्यांचा वापर व परिरक्षण आणि अशी साधनसामग्री चालवण्यासाठी किंवा कार्यान्वित करण्यासाठी सक्षम व्यक्तींची नियुक्ती;

(ङ) जेथे आवश्यक असेल तेथे, नियतकालिक चाचणी व तपासणी आणि औष्मिक उपचार यांसह, उच्चलन यंत्रे, उद्वाही उपकरणे आणि उद्वाही गिअर यांची उभारणी, मांडणी, त्यांचा वापर व त्यांचे परिरक्षण, भार वर नेताना किंवा खाली आणताना घ्यावयाची खबरदारी, त्यांतून व्यक्तींची ने-आण करण्यावरील निर्बंध आणि उच्चलन यंत्रे किंवा इतर उद्वाही उपकरणे यांवरील सक्षम व्यक्तींची नियुक्ती.

(च) जेथे उच्चलन यंत्रे, उद्वाही उपकरणे किंवा उद्वाही गिअर यांचा वापर करून वर नेण्याची किंवा खाली आणण्याची कामे केली जातात अशा प्रत्येक कामाच्या ठिकाणी, आणि प्रत्येक कामाच्या ठिकाणाच्या पोच मार्गांवर आणि कामावर असलेल्या इमारत कामगारांना धोकादायक असलेल्या अशा सर्व खुल्या जागी, पुरेशी व यथोचित प्रकाशयोजना;

(छ) कोणत्याही साहित्याची भरडणी, चाळणी, फवारणी किंवा प्रक्रिया, यांदरम्यान धूळ, धूर, वायू किंवा वाफ श्वासावाटे शरीरात जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, आणि प्रत्येक कामाच्या ठिकाणी किंवा बंदिस्त जागेत पुरेसे वायुवीजन करण्यासाठी व ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना;

(ज) साहित्य किंवा माल एका जागी, रचताना किंवा काढताना, साठवून ठेवताना किंवा हलवताना, हाताळणी करताना करावयाच्या उपाययोजना;

(झ) प्रत्येक जडचक्र किंवा मूळ गतित्राचा प्रत्येक चल भाग आणि पारेषणाचा किंवा अन्य यंत्रसामग्रीचा प्रत्येक भाग, जर कोणत्याही परिकर्मावर (ऑपरेशनवर) काम करणारा प्रत्येक कामगार सुरक्षित राहील अशा स्थितीत किंवा अशा बांधणीचा नसेल तर, आणि जणू काही तेथे सुरक्षित कुंपन घातलेले नाही असे समजून, त्यांस कुंपन घालण्यासह यंत्रसामग्रीस संरक्षक उपाययोजना करणे;

(ञ) संपीडित वायुवर चालणारी हत्यारे व साधनसामग्री यांसह संयंत्राची सुरक्षित हाताळणी व वापर;

(ट) आग लागल्यास, घ्यावयाची खबरदारी;

(ठ) कामगारांकडून उचलल्या जाणाऱ्या किंवा हलवल्या जाणाऱ्या वजनाची मर्यादा;

(ड) कोणत्याही कामाच्या ठिकाणापर्यंत व ठिकाणापासून जलमार्गाने कामगारांची सुरक्षित वाहतूक आणि बुडण्यापासून बचाव करणाऱ्या साधनांची तरतूद;

(ढ) विद्युत यंत्रसामग्री व साधने यांच्यासह विद्युत प्रवाह सुरू असलेले तारमार्ग किंवा उपकरण संच यांच्यापासून आणि उपरितारमार्गांपासून कामगारांना होणारा धोका टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना;

(ण) जेथे कामाच्या विशेष स्वरुपामुळे किंवा परिस्थितीमुळे कामगारांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना पुरवणे आवश्यक असेल तेथे सुरक्षा जाळ्या, सुरक्षा पत्रे व सुरक्षा पट्टे लावणे.

(त) परांची, शिड्या व जिने, उद्वाही उपकरणे, दोरखंड, साखळ्या व उपसाधने, माती उचलणारी यंत्रे आणि जलतरण क्रियात्मक साधनसामग्री यांच्या संबंधात अनुपालन करावयाची मानके;

(थ) ढीग उपसणारे वाहन चालवणे, क्राँक्रिट काम, उष्ण ॲस्फाल्ट, डांबर किंवा इतर तत्सम वस्तूंसंबंधातील काम, विसंवहन कार्य, पाडकाम कार्ये, उत्खनन, भुयारी बांधकाम व हाताळणी साहित्य यांच्या संबंधात घ्यावयाची खबरदारी;

(द) इमारत व इतर बांधकामविषयक कामांमध्ये करावयाच्या कार्यांसाठी नियोक्ते व कंत्राटदार यांनी तयार करावयाचे सुरक्षा धोरण, म्हणजेच, इमारत कामगारांची सुरक्षा व आरोग्य यांची सुनिश्‍चिती करण्यासाठी हाती घ्यावयाच्या उपाययोजना, त्यांच्यासाठी प्रशासकीय व्यवस्था आणि त्यांच्याशी संबंधित बाबीं;

(ध) इमारत व इतर बांधकामविषयक कामासंबंधी, भारतीय मानक ब्यूरो अधिनियम, १९८६ अन्वये स्थापन केलेल्या भारतीय मानक ब्यूरोला त्या अधिनियमाखाली समाविष्ट असलेल्या कोणत्याही वस्तूच्या वापरासंबंधी किंवा प्रक्रियेसंबंधी सादर करावयाची माहिती; १९८६ चा ६३.

(न) इमारत कामगारांसाठी वैद्यकीय सुविधांची तरतूद व परिरक्षण;

(प) इमारतीत व इतर बांधकामविषयक कामावर करीत असलेल्या कोणत्याही परिकर्मामध्ये, काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षा आणि त्यांचे आरोग्य यांसंबंधातील इतर कोणतीही बाब.

**सुरक्षा उपाययोजनांसाठी आदर्श नियम तयार करणे.**

४१. केंद्र सरकारला, कलम ५ अन्वये घटित केलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर, कलम ४० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात, आदर्श नियम करता येतील, आणि जेव्हा अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात असे कोणतेही आदर्श नियम करण्यात आले असतील तेव्हा, समुचित शासन, कलम ४० अन्वये त्या बाबीच्या संबंधात कोणतेही नियम करतेवेळी, व्यवहार्य असेल तेथवर, अशा आदर्श नियमांना पुष्टी देईल.

## प्रकरण आठ

## निरीक्षण कर्मचारीवर्ग

**महासंचालक, मुख्य निरीक्षक व निरीक्षक यांची नियुक्ती.**

४२. (१) केंद्र सरकारला, अधिसूचनेद्वारे, त्या सरकारच्या एखाद्या राजपत्रित अधिकाऱ्याची निरीक्षण महासंचालक म्हणून नियुक्ती करता येईल, जो, निरीक्षणाची मानके निर्धारित करण्यासाठी जबाबदार असेल आणि ज्या आस्थापनांसाठी केंद्र सरकार समुचित शासन असेल त्या सर्व आस्थापनांच्या संबंधात, तो, संपूर्ण भारतभर निरीक्षकाच्या अधिकारांचादेखील वापर करील.

(२) राज्य शासनास, अधिसूचनेद्वारे, त्या शासनाच्या एखाद्या राजपत्रित अधिकाऱ्याची मुख्य निरीक्षक, इमारत व बांधकाम निरीक्षण म्हणून नियुक्ती करता येईल, जो, त्या राज्यात या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असेल आणि ज्या आस्थापनांसाठी राज्य शासन समुचित शासन असेल त्या आस्थापनांच्या संबंधात तो, संपूर्ण राज्यभर या अधिनियमाखालील निरीक्षकाच्या अधिकारांचादेखील वापर करील.

(३) समुचित शासनास, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, निरीक्षक म्हणून, त्याला योग्य वाटेल अशा संख्येतील त्याच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल आणि त्याला योग्य वाटेल, अशा स्थानिक सीमा त्यांना नेमून देता येतील.

(४) या कलमाअन्वये नियुक्त केलेला प्रत्येक निरीक्षक हा, महासंचालक किंवा यथास्थिति, मुख्य निरीक्षक यांच्या नियंत्रणाच्या अधीन असेल, आणि महासंचालकाच्या किंवा मुख्य निरीक्षकाच्या सर्वसाधारण नियंत्रणास आणि पर्यवेक्षणास अधीन राहून, या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करील आणि त्याची कार्ये पार पाडील.

(५) महासंचालक, मुख्य निरीक्षक व प्रत्येक निरीक्षक हे, भारतीय दंड संहिता याच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येतील. १८६० चा ४५.

**निरीक्षकांचे अधिकार.**

४३. (१) याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन राहून, निरीक्षकास, ज्या स्थानिक सीमांच्या बाबतीत त्याची नियुक्ती केली असेल त्या स्थानिक सीमांमध्ये,—

(क) या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये ठेवण्याची किंवा प्रदर्शित करण्याची आवश्यकता असलेल्या कोणत्याही नोंदवहीची किंवा अभिलेखाची किंवा नोटिशींची तपासणी करण्याच्या

प्रयोजनार्थ, जेथे इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम केले जात आहे अशा कोणत्याही परिवास्तूंमध्ये किंवा ठिकाणी, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरणाच्या सेवेतील व्यक्ती असलेल्या अशा सहायकांसह (कोणतेही असल्यास), सर्व वाजवी वेळेत प्रवेश करता येईल आणि तपासणीसाठी ते सादर करण्यास भाग पाडता येईल;

(ख) त्याला, जी व्यक्ती अशा कोणत्याही परिवास्तूंमध्ये किंवा ठिकाणी आढळेल आणि जी व्यक्ती त्यामध्ये नोकरीवर ठेवलेली इमारत कामगार आहे, असा विश्वास ठेवण्यास त्याला वाजवी कारण असेल अशा कोणत्याही व्यक्तीची तपासणी करता येईल;

(ग) कोणत्याही इमारत कामगाराला इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, ज्यांच्यासाठी व ज्यांना इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम दिले आहे किंवा प्राप्त झाले आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ते याबाबतीत, आणि इमारत व इतर बांधकामविषयक कामाबद्दल द्यावयाच्या प्रदानांच्या बाबतीत जी माहिती देणे तिच्या अधिकारात आहे अशी कोणतीही माहिती देण्यासाठी भाग पाडता येईल;

(घ) नियोक्त्याने जो अपराध केला आहे असा विश्वास ठेवण्यास त्याला कारण असेल अशा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या बाबतीत त्याला संबद्ध वाटेल, अशा नोंदवहीच्या वेतनाच्या अभिलेखाच्या किंवा नोटिशींच्या किंवा तिच्या भागांच्या प्रती जप्त करता येतील किंवा घेता येतील;

(ङ) विहित करण्यात येईल अशा अन्य अधिकारांचा वापर करता येईल.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, महासंचालकास किंवा यथास्थिति, मुख्य निरीक्षकास, विहित करण्यात येईल अशी अर्हता व अनुभव असलेल्या तज्ज्ञांची किंवा अभिकरणांची आणि अशा अटी व शर्तींवर नेमणूक करता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये, निरीक्षकाने मागितलेला कोणताही दस्तऐवज सादर करण्यास किंवा
१९६० कोणतीही माहिती देण्यास भाग पाडलेली कोणतीही व्यक्ती, भारतीय दंड संहिता याच्या कलम १७५ व १७६
चा ४५. च्या अर्थांतर्गत तसे करण्यास कायद्याने बांधील असल्याचे मानण्यात येईल.

१९७४ (४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, उक्त संहितेच्या कलम
चा २. ९४ अन्वये काढलेल्या वॉरंटच्या प्राधिकाराखाली केलेल्या कोणत्याही झडतीला किंवा जप्तीला जशा लागू होतात तशाच त्या पोट-कलम (१) खालील अशा झडतीला किंवा जप्तीला लागू असतील.

## प्रकरण नऊ

## विशेष तरतुदी

**नियोक्त्यांची जबाबदारी.**

**४४.** नियोक्ता, सुरक्षेच्या संबंधात या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करण्याची सुनिश्चिती करण्याकरिता, त्याच्या आस्थापनेतील कोणत्याही इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाचे निरंतर व पुरेसे पर्यवेक्षण करण्यासाठी आणि अपघातांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक त्या सर्व व्यवहार्य उपाययोजना हाती घेण्यासाठी जबाबदार असेल.

**वेतन व नुकसान भरपाई यांच्या प्रदानाची जबाबदारी.**

**४५.** (१) नियोक्ता, त्याने नोकरीवर ठेवलेल्या प्रत्येक इमारत कामगाराला वेतनाचे प्रदान करण्यासाठी जबाबदार असेल आणि असे वेतन, विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी प्रदान करण्यात येईल.

(२) कंत्राटदार, त्याने नोकरीवर ठेवलेल्या एखाद्या इमारत कामगाराच्या बाबतीत, भरपाईची रक्कम जेव्हा देय होईल तेव्हा ती प्रदान करण्यास तो जेव्हा दायी असेल तेव्हा, ती प्रदान करण्यात कसूर करील किंवा तिचे कमी प्रदान करीत असेल अशा प्रकरणी, कामगाराचा मृत्यू झाला असेल किंवा तो विकलांग

झाला असेल त्याबाबतीत, नियोक्ता, श्रमिक भरपाई अधिनियम, १९२३ याच्या तरतुदींनुसार देय असलेल्या नुकसान भरपाईचे संपूर्ण प्रदान करण्यास किंवा प्रदान न केलेल्या शिल्लक रकमेचे प्रदान करण्यास दायी असेल आणि तो, अशा प्रकारे प्रदान केलेली रक्कम, एकतर त्या कंत्राटदाराला कोणत्याही कंत्राटाखाली प्रदेय असलेल्या कोणत्याही रकमेतून वजात करून किंवा कंत्राटदाराकडून येणे असलेले कर्ज म्हणून कंत्राटदाराकडून वसूल करील. १९२३ चा ८.

**इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम सुरू करण्याची नोटीस.**

**४६.** (१) नियोक्ता, कोणत्याही इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाची सुरूवात करण्यापूर्वी, किमान तीस दिवस अगोदर, जेथे प्रस्तावित इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम करावयाचे आहे त्या क्षेत्रातील अधिकारिता असलेल्या निरीक्षकाला पुढील बाबी अंतर्भूत असलेली एक लेखी नोटीस पाठवील किंवा पाठवण्याची व्यवस्था करील.

(क) जेथे इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम करण्याचे प्रस्तावित आहे, त्या ठिकाणाचे नाव व परिस्थिती;

(ख) जिने इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम हाती घेतले आहे, त्या व्यक्तीचे नाव व पत्ता;

(ग) इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाशी संबंधित असणारा पत्रव्यवहार ज्या पत्त्यावर पाठवता येईल तो पत्ता;

(घ) अंतर्भूत असलेल्या कामाचे स्वरुप आणि पुरविलेले कोणतेही संयंत्र व यंत्रसामग्री यांसह सुविधा;

(ङ) इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामात वापरावयाच्या स्फोटकांचा, कोणताही असल्यास, साठा करून ठेवण्याची व्यवस्था;

(च) इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाच्या विविध टप्प्यांमध्ये, नोकरीवर ठेवण्याची शक्यता असलेल्या कामगारांची संख्या;

(छ) ज्या व्यक्तीकडे स्थळावरील इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाचा संपूर्ण प्रभार असेल त्या व्यक्तीचे नाव व पदनाम;

(ज) कामाचा अंदाजे कालावधी;

(झ) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

(२) जेव्हा पोट-कलम (१) अन्वये सादर केलेल्या कोणत्याही तपशिलामध्ये कोणताही बदल घडून आला असेल त्याबाबतीत, नियोक्ता, असा बदल झाल्यापासून दोन दिवसांच्या आत, निरीक्षकाला, असा बदल कळवील.

(३) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, समुचित शासनास, अधिसूचनेद्वारे आपत्कालीन कामे म्हणून विनिर्दिष्ट करता येतील अशा इमारत किंवा इतर बांधकामविषयक कामाच्या वर्गाच्या बाबतीत, लागू असणार नाही.

## प्रकरण दहा

## शास्ती व कार्यपद्धती

**सुरक्षा उपाययोजनांशी संबंधित असणाऱ्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.**

**४७.** (१) जो कोणी, कलम ४० अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील, तो, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा त्या दोन्ही शिक्षांस पात्र असेल, आणि असे उल्लंघन करणे सतत सुरू राहिल्यास, अशा पहिल्या उल्लंघनाच्या दोषसिध्दीनंतर, ज्या कालावधीत असे उल्लंघन करणे चालू राहिले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाकरिता, शंभर रुपयापर्यंत वाढविता येईल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(२) ज्या व्यक्तीस, पोट-कलम (१) खालील शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, उल्लंघनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरली असेल किंवा तिने त्याच तरतुदीचे अनुपालन करण्यात कसूर केली असेल तर, ती, नंतरच्या दोषसिद्धीबद्दल सहा महिन्यापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा पाचशे रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा त्या दोन्ही शिक्षांस पात्र असेल :

परंतु, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, नंतरच्या ज्या अपराधाबद्दल त्या व्यक्तीला दोषी ठरवले जात असेल, तो अपराध केल्याच्या दोन वर्षांपेक्षा अधिक काळापूर्वी घडलेल्या कोणत्याही दोषसिध्दीची दखल घेतली जाणार नाही :

परंतु आणखी असे की, शास्ती लादणाऱ्या प्राधिकाऱ्यास, जर अशा कार्यवाहीचे समर्थन करणाऱ्या अपवादात्मक परिस्थिती आहेत याबद्दल त्याची खात्री पटली असेल तर, त्याबद्दलची कारणे लेखी नमूद केल्यानंतर, पाचशे रुपयांपेक्षा कमी असेल इतका द्रव्यदंड लादता येईल.

**इमारत किंवा इतर बांधकाम सुरू करण्याची नोटीस देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.**

**४८.** जेव्हा नियोक्त्याने, कलम ४६ अन्वये इमारत किंवा इतर बांधकामविषयक काम सुरू करण्याबाबतची नोटीस देण्यात कसूर केली असेल त्याबाबतीत, तो तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा त्या दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**अडथळे आणल्याबद्दल शास्ती.**

**४९.** (१) जो कोणी, निरीक्षकाला, या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडताना अडथळा आणील किंवा एखाद्या आस्थापनेच्या संबंधात, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये प्राधिकृत केलेले कोणतेही निरीक्षण, तपासणी, चौकशी किंवा अन्वेषण करण्यासाठी त्या निरीक्षकाला कोणतीही वाजवी सुविधा देण्यास नकार देईल किंवा बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करील, तो, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा त्या दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) जो कोणी, या अधिनियमानुसार ठेवलेल्या कोणत्याही नोंदवहीची किंवा इतर दस्तऐवजाची, निरीक्षकाने मागणी केल्यावर, ते सादर करण्यास बुद्धिपुरस्सर नकार देईल किंवा या अधिनियमाखालील त्याच्या कर्तव्यांच्या अनुषंगाने कार्य करणाऱ्या निरीक्षकासमोर हजर होण्यापासून किंवा त्याच्याकडून तपासणी केली जाण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रतिबंध करील, किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील, किंवा प्रतिबंध करण्याचा संभव असेल, असा विश्वास ठेवण्यास त्याला कारण असेल अशी कोणतीही गोष्ट करील, तो, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, किंवा त्या दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**इतर अपराधांबद्दल शास्ती.**

**५०.** (१) जो कोणी, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करील किंवा जो या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे अनुपालन करण्यात कसूर करील तो, जेव्हा अशा उल्लंघनाबद्दल किंवा कसुरीबद्दल कोणत्याही शास्तीची अन्यत्र स्पष्ट तरतूद केली नसेल त्याबाबतीत, अशा प्रत्येक उल्लंघनाबद्दल किंवा यथास्थिति, कसुरीबद्दल एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल, आणि असे उल्लंघन किंवा, यथास्थिति, कसूर करण्याचे सतत चालू राहिले असेल त्याबाबतीत, अशा पहिल्या उल्लंघनाच्या किंवा कसुरीच्या दोषसिद्धीनंतर, ज्या कालावधीत असे उल्लंघन किंवा कसूर करणे चालू राहिले असेल अशा कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(२) पोट-कलम (१) खालील शास्ती,—

(क) ज्या बाबींच्या संबंधात समुचित शासन हे केंद्र सरकार असेल, अशा बाबींशी संबंधित असलेल्या उल्लंघनाच्या किंवा कसुरीच्या बाबतीत, महासंचालककाकडून; आणि

(ख) ज्या बाबींच्या संबंधात समुचित शासन हे राज्य शासन असेल अशा बाबींशी संबंधित असलेल्या उल्लंघनाच्या किंवा कसुरीच्या बाबतीत, मुख्य निरीक्षककाकडून,

लादता येईल.

(३) संबंधित व्यक्तीला,—

(क) ज्या कारणांवरुन शास्ती लादण्याचे प्रस्तावित केले आहे ती कारणे कळविणारी ; आणि

(ख) नोटिशीत नमूद केलेली शास्ती लादण्याविरुद्ध, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी मुदतीत लेखी अभिवेदन सादर करण्याची, आणि तिची तशी इच्छा असल्यास, त्या प्रकरणी म्हणणे मांडण्याची वाजवी संधी तिला देणारी,

लेखी नोटीस दिल्याशिवाय, अशी कोणतीही शास्ती लादण्यात येणार नाही.

(४) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या इतर कोणत्याही तरतुदीला बाध न येता, महासंचालककास व मुख्य निरीक्षकास, या कलमाखालील कोणत्याही अधिकारांचा वापर करताना, पुढील बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये एखाद्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील, जसे की,— १९०८ चा ५.

(क) साक्षीदारांना समन्स पाठविणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्माविणे;

(ग) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सार्वजनिक अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे;

(घ) प्रतिज्ञापत्रावर पुरावा स्वीकारणे; आणि

(ङ) साक्षीदारांची व दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

(५) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमाद्वारे किंवा यथास्थिति, इतर कोणत्याही कायद्याद्वारे शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा इतर कोणत्याही कायद्यान्वये खटला भरण्यापासून, अथवा या कलमाद्वारे अशा अपराधासाठी तरतूद केल्यापेक्षा अन्य कोणत्याही, किंवा उच्चतर शास्तीस किंवा शिक्षेस या अधिनियमान्वये किंवा अशा कोणत्याही कायद्यान्वये पात्र ठरविली जाण्यास, संबंधित व्यक्तीला प्रतिबंध होतो, असा अन्वयार्थ लावला जाणार नाही :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस एकाच अपराधाबद्दल दोन वेळा शिक्षा केली जाणार नाही.

अपील. **५१.** (१) कलम ५० खालील कोणतीही शास्ती लादल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशी शास्ती लादल्याचे अशा व्यक्तीला कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत,—

(क) जेव्हा शास्ती, महासंचालककाकडून लादण्यात आली असेल त्याबाबतीत, केंद्र सरकारकडे,

(ख) जेव्हा शास्ती मुख्य निरीक्षककाकडून लादण्यात आली असेल त्याबाबतीत, राज्य शासनाकडे,

अपील करता येईल :

परंतु, केंद्र सरकारला, किंवा यथास्थिति, राज्य शासनाला, उपरोक्त तीन महिन्यांच्या कालावधीत अपील करण्यापासून अपीलकर्त्याला पुरेशा कारणांमुळे प्रतिबंध झाला होता याबाबत खात्री पटली असेल तर, आणखी तीन महिन्यांच्या कालावधीत असे अपील दाखल करून घेण्यास मुभा देता येईल.

(२) अपील प्राधिकाऱ्यास, जर अपीलकर्त्याची, आपले म्हणणे मांडण्याची इच्छा असेल तर, त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, आणि त्याला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी, कोणतीही असल्यास, केल्यानंतर, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे, ज्या विरूद्ध अपील केले असेल तो आदेश कायम करणारा, त्यात सुधारणा करणारा किंवा तो फिरवणारा आदेश देता येईल किंवा नव्याने निर्णय करण्यासाठी त्याला योग्य वाटतील अशा निदेशांसह, ते प्रकरण परत पाठवता येईल.

**५२.** जेव्हा कलम ५० अन्वये कोणत्याही व्यक्तीवर लादलेली कोणतीही शास्ती प्रदान केली नसेल त्याबाबतीत,— **शास्तीची वसुली.**

(एक) महासंचालकास, किंवा, यथास्थिति, मुख्य निरीक्षकास, अशा व्यक्तीस देणे असलेल्या त्याच्या नियंत्रणाखाली असतील अशा कोणत्याही पैशातून, अशा प्रकारे प्रदेय असलेली रक्कम वजा करता येईल; किंवा

(दोन) महासंचालकास, किंवा, यथास्थिति, मुख्य निरीक्षकास, अशा व्यक्तीच्या मालकीचा जो माल त्याच्या नियंत्रणाखाली असेल तो माल अडकावून ठेवून किंवा त्याची विक्री करून, अशा प्रकारे प्रदेय असलेल्या रकमेची वसुली करता येईल; किंवा

(तीन) जर खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, अशा व्यक्तीकडून रक्कम वसूल करणे शक्य झाले नसेल तर, महासंचालकास किंवा, यथास्थिति, मुख्य निरीक्षकास, अशा व्यक्तीकडून येणे असलेली रक्कम विनिर्दिष्ट करून, आपल्या स्वाक्षरीनिशी एक प्रमाणपत्र तयार करता येईल आणि ज्या जिल्ह्यामध्ये अशा व्यक्तीच्या मालकीची कोणतीही मालमत्ता आहे किंवा ती राहते किंवा व्यवसाय करते, त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याला ते प्रमाणपत्र पाठविता येईल आणि उक्त जिल्हाधिकारी असे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर, जणू काही ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी होती असे समजून त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम, अशा व्यक्तीकडून वसूल करण्याची कार्यवाही करील.

**५३.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तेव्हा, अपराध घडला त्यावेळी जी व्यक्ती कंपनीची प्रभारी होती आणि त्या कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार होती, अशी प्रत्येक व्यक्ती तसेच ती कंपनी, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा होण्यास पात्र असतील : **कंपन्यांनी केलेले अपराध.**

परंतु, तो अपराध आपल्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी आपण सर्व प्रकारे योग्य तत्परता दाखवली होती, असे कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र असणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील कोणताही अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि असा अपराध हा त्या कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने करण्यात आला असेल किंवा त्या अपराधाचा त्याने केलेल्या कोणत्याही प्रकारच्या हलगर्जीपणाशी संबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा होण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) “कंपनी” याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे, आणि त्यामध्ये, एखादी भागीदारी संस्था किंवा इतर व्यक्तींचा संघ, याचा समावेश होतो; आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संबंधातील “संचालक” याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेमधील भागीदार, असा आहे.

अपराधांची दखल.

**५४.** (१) कोणतेही न्यायालय,—

(क) महासंचालकाने किंवा मुख्य निरीक्षकाने केलेल्या किंवा त्याच्या लेखी पूर्वमंजुरीने केलेल्या; किंवा

(ख) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणी केलेल्या स्वयंसेवी संघटनेच्या पदाधिकाऱ्याने केलेल्या; किंवा १८६० चा २१.

(ग) व्यवसाय संघ अधिनियम, १९२६ खाली नोंदणी केलेल्या कोणत्याही संबंधित व्यवसाय संघाच्या पदाधिकाऱ्याने केलेल्या, १९२६ चा १६.

तक्रारीखेरीज, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

(२) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयास दुय्यम असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

खटल्यांची मुदत.

**५५.** कोणतेही न्यायालय, ज्या दिनांकास अभिकथित अपराध घडल्याचे महासंचालक, मुख्य निरीक्षक, स्वयंसेवी संघटनेचा पदाधिकारी, किंवा, यथास्थिति, कोणत्याही संबंधित व्यवसाय संघाचा पदाधिकारी यांच्या निदर्शनास आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, त्या अपराधाची तक्रार केल्याखेरीज, या अधिनियमाखालील शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणार नाही.

## प्रकरण अकरा

## संकीर्ण

अधिकारांचे प्रत्यायोजन.

**५६.** मंडळास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्याला आवश्यक वाटतील असे, या अधिनियमाखालील त्याचे अधिकार व अशी कर्तव्ये, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती व मर्यादांना, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, मंडळाचा अध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य अथवा सचिव किंवा इतर कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना प्रत्यायोजित करता येतील.

विवरणे.

**५७.** प्रत्येक मंडळ, केंद्र सरकार व राज्य शासन मागणी करतील अशी विवरणे, वेळोवेळी त्यांना सादर करील.

इमारत कामगारांना १९२३ चा अधिनियम क्रमांक ८ लागू असणे.

**५८.** कामगार भरपाई अधिनियम, १९२३ याच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, जणू काही हा अधिनियम ज्या रोजगाराला लागू होतो, त्या रोजगाराचा त्या अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये समावेश केला होता असे समजून, इमारत कामगारांना लागू होतील.

सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**५९.** (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा काढलेल्या आदेशाच्या अनुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तींविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही.

(२) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा काढलेल्या आदेशाच्या अनुसार, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे घडून आलेल्या किंवा घडण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल, शासन, या अधिनियमान्वये घटित केलेले कोणतेही मंडळ किंवा समित्या किंवा अशा मंडळाचा कोणताही सदस्य किंवा शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी किंवा शासनाने किंवा कोणत्याही मंडळाने किंवा समितीने प्राधिकृत केलेली इतर कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध, कोणताही खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही.

**निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**६०.** केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची त्या राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत, कोणत्याही राज्य शासनाला किंवा मंडळाला निदेश देता येतील.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**६१.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षे समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**नियम करण्याचा अधिकार.**

**६२.** (१) समुचित शासनास तज्ज्ञ समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांत, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ च्या पोट-कलम (३) किंवा, यथास्थिति, कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये, केंद्रीय सल्लागार समितीवर व राज्य सल्लागार समित्यांवर वेगवेगळ्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या, त्यांचा पदावधी व सेवेच्या इतर शर्ती, त्यांची कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि रिक्त जागा भरण्याची रीत;

(ख) कलम ५ च्या पोट-कलम (२) अन्वये, तज्ज्ञ समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी त्या समितीच्या सदस्यांना प्रदान करण्यात येतील असे शुल्क व भत्ते;

(ग) कलम ७ च्या पोट-कलम (२) खालील, आस्थापनेची नोंदणी करण्याच्या अर्जाचा नमुना, त्यासाठी फी आकारणे आणि त्यात अंतर्भूत करता येतील असे तपशील;

(घ) कलम ७ च्या पोट-कलम (३) खालील, नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना, ज्या मुदतीत व ज्या शर्तींच्या अधीन राहून असे प्रमाणपत्र देण्यात येईल ती मुदत व शर्ती;

(ङ) कलम ७ च्या पोट-कलम (४) अन्वये, ज्या नमुन्यात मालकी किंवा व्यवस्थापन किंवा इतर तपशील यांमधील बदल, नोंदणी अधिकाऱ्याला कळविण्यात येतील तो नमुना;

(च) कलम १२ च्या पोट-कलम (२) अन्वये, लाभार्थी म्हणून नोंदणीसाठी ज्या नमुन्यात अर्ज करण्यात येईल तो नमुना;

(छ) कलम १२ च्या पोट-कलम (३) अन्वये, अर्जासोबत जोडण्यात येईल तो दस्तऐवज व शुल्क;

(ज) कलम १२ च्या पोट-कलम (६) अन्वये, मंडळाचा सचिव, ज्या ठेवण्याची व्यवस्था करील त्या नोंदवह्या;

(झ) कलम १४ च्या पोट-कलम (२) अन्वये देण्यात येतील असे लाभ;

(ञ) कलम १५ अन्वये ज्या नमुन्यात लाभार्थी नोंदवही ठेवण्यात येईल तो नमुना;

(ट) कलम १८ च्या पोट-कलम (४) अन्वये, मंडळाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती, त्यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांची नैमित्तिक रिक्त पदे भरण्याची रीत;

(ठ) कलम १९ च्या पोट-कलम (३) अन्वये, मंडळाचा सचिव व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते;

(ड) कलम २० च्या पोट-कलम (१) अन्वये, मंडळाच्या बैठकीची वेळ व ठिकाण आणि अशा बैठकीचे कामकाज चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या गणपूर्तीसह बैठकीत अनुसरावयाचे कार्यपद्धतीविषयक नियम;

(ढ) कलम २२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, घर बांधणी कर्जे किंवा अग्रिमे म्हणून प्रदेय असलेली रक्कम, अशा प्रदानाच्या अटी व शर्ती, खंड (ङ) अन्वये शैक्षणिक सहाय्य, खंड (च) अन्वये, प्रदेय असलेला वैद्यकीय खर्च आणि लाभार्थीवर अवलंबून असतील अशा व्यक्ती, आणि खंड (ज) अन्वये, ज्यासाठी तरतूद करण्यात येईल अशा इतर कल्याणकारी उपाययोजना;

(ण) कलम २२ च्या पोट-कलम (३) च्या खंड (ख) अन्वये, स्थानिक प्राधिकरणांना आणि नियोक्त्यांना प्रदेय असलेल्या सहाय्यक अनुदानाची मर्यादा;

(त) कलम २५ अन्वये, ज्या नमुन्यात व ज्या कालावधीत मंडळाचा अर्थसंकल्प तयार करण्यात येईल व सरकारला पाठविण्यात येईल, तो नमुना व तो कालावधी;

(थ) कलम २६ अन्वये, ज्या नमुन्यात व ज्या कालावधीत, मंडळाचा वार्षिक अहवाल राज्य शासनाला व केंद्र सरकारला सादर करण्यात येईल, तो नमुना व तो कालावधी;

(द) कलम २७ च्या पोट-कलम (१) खालील वार्षिक लेखा विवरणपत्राचा नमुना, आणि पोट-कलम (४) अन्वये, ज्या दिनांकापूर्वी लेखापरीक्षकाच्या अहवालासह लेख्यांची लेखापरीक्षा केलेली प्रत सादर करण्यात येईल तो दिनांक;

(ध) कलम २८ च्या पोट-कलम (१) अन्वये, तरतूद करण्याची आवश्यकता असलेल्या बाबी, आणि त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये, इमारत कामगारांना ज्या मर्यादेपर्यंत व ज्या शर्तींना अधीन राहून, त्या पोट-कलमाच्या तरतुदी लागू होतील ती मर्यादा व त्या शर्ती;

(न) कलम ३० च्या पोट-कलम (१) अन्वये, नियोक्त्याकडून ठेवण्यात येतील त्या नोंदवह्या व अभिलेख आणि अशा नोंदवह्या व अभिलेख ज्या नमुन्यात ठेवण्यात येतील तो नमुना आणि त्यामध्ये अंतर्भूत करावयाचे तपशील;

(प) कलम ३० च्या पोट-कलम (२) अन्वये, ज्या नमुन्यात व ज्या रीतीने नोटीस प्रदर्शित करण्यात येईल तो नमुना व ती रीत आणि तीमध्ये अंतर्भूत असलेले तपशील;

(फ) कलम ३० च्या पोट-कलम (३) अन्वये, इमारत कामगारांना वेतन पुस्तिका आणि वेतन चिठ्ठी देणे आणि वेतन पुस्तिका किंवा वेतन चिठ्ठ्या यांमध्ये ज्या रीतीने नोंदी करण्यात येतील व त्या अधिप्रमाणित करण्यात येतील ती रीत;

(ब) कलम ३३ अन्वये, तरतूद करण्याची आवश्यकता असलेल्या शौचालयांचे व मुताऱ्यांचे प्रकार;

(भ) कलम ३६ अन्वये, ज्यांची तरतूद करावयाची आहे अशा प्रथमोपचार सुविधा;

(म) कलम ३७ च्या खंड (क) अन्वये, ज्यांची तरतूद करावयाची आहे त्या उपाहारगृह सुविधा;

(य) कलम ३७ च्या खंड (ख) अन्वये, ज्यांची तरतूद करावयाची आहे अशा कल्याणकारी उपाययोजना;

(यक) कलम ३८ च्या पोट-कलम (१) अन्वये, नियोक्ता व इमारत कामगार यांच्या प्रतिनिधींची संख्या आणि त्या कलमांच्या पोट-कलम (२) अन्वये, सुरक्षा अधिकाऱ्यांच्या अर्हता व त्यांनी पार पाडावयाची कर्तव्ये;

(यख) कलम ३९ च्या पोट-कलम (१) अन्वये, देण्यात येईल अशा अपघाताच्या नोटिशीचा नमुना, याबाबतीत तरतूद करावयाच्या इतर बाबी आणि ज्या वेळेत अशी नोटीस देण्यात येईल ती वेळ;

(यग) कलम ४० अन्वये, इमारत कामगारांची सुरक्षा आणि आरोग्य यांबाबतीत केले जाणारे नियम;

(यघ) कलम ४३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ङ) अन्वये, निरीक्षकाला वापर करता येतील असे अधिकार आणि त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये, नियुक्त केलेल्या तज्ज्ञ व्यक्ती किंवा अभिकरणे ज्या अर्हता व अनुभव धारण करतील त्या अर्हता व अनुभव आणि अशा तज्ज्ञ व्यक्ती किंवा अभिकरणे यांची ज्या अटीं व शर्तींवर नियुक्ती करण्यात येईल, त्या अटी व शर्ती;

(यङ) कलम ४५ अन्वये, ज्या दिनांकास किंवा दिनांकापूर्वी इमारत कामगारांना मजुरी प्रदान करण्यात येईल तो दिनांक;

(यच) कलम ४६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (झ) अन्वये, ज्या विहित करण्याची आवश्यकता आहे, अशा बाबी;

(यछ) विहित करण्याची आवश्यकता असेल किंवा विहित करता येईल, अशी अन्य कोणतीही बाब.

(३) केंद्र सरकारने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, एकाच सत्रात, अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता ते सत्रासीन असताना, ठेवण्यात येईल, आणि जर, पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(४) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, होईल तितक्या लवकर, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहांनी मिळून बनलेले असेल तेथे त्या प्रत्येक सभागृहासमोर, किंवा जेथे राज्य विधानमंडळ एका सभागृहाने मिळून बनलेले असेल, तेथे त्या सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**विवक्षित कायद्यांची व्यावृत्ती.** **६३.** या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये केलेल्या तरतुदींपेक्षा ज्या इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी अधिक लाभकारक आहेत अशा कल्याणकारी योजनांची तरतूद करणाऱ्या राज्यांतील कोणत्याही तत्सम कायद्यांच्या अंमलबजावणीवर कोणताही परिणाम होणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.** **६४.** (१) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्तीचे विनियमन) तृतीय अध्यादेश, १९९६ याद्वारे निरसित केला आहे. १९९६ चा अध्यादेश २५.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा हाती घेतलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केलेली असल्याचे किंवा हाती घेण्यात आलेली असल्याचे मानण्यात येईल.

# तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९

## (२०१९ चा अधिनियम क्रमांक ४०)

(२६ सप्टेंबर, २०२५ रोजी यथाविद्यमान)

(५ डिसेंबर, २०१९.)

तृतीयपंथी व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व त्यांच्या कल्याणासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी संसदेकडून, पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९, असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[१] अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "समुचित शासन" याचा अर्थ,—

(एक) केंद्र सरकारच्या किंवा त्या सरकारने संपूर्णतः किंवा भरीव प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात, केंद्र सरकार;

(दोन) राज्य शासनाच्या किंवा त्या शासनाने संपूर्णतः किंवा भरीव प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या कोणत्याही आस्थापनेच्या, किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या संबंधात, राज्य शासन,

असा आहे;

(ख) "आस्थापना" याचा अर्थ,—

(एक) एखाद्या केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेला कोणताही निकाय किंवा प्राधिकरण अथवा शासनाची मालकी किंवा नियंत्रण असलेले किंवा त्याचे सहाय्य मिळालेले प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्थानिक प्राधिकरण, किंवा कंपनी अधिनियम २०१३ याच्या कलम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शासकीय कंपनी, असा आहे आणि त्यात शासनाच्या विभागाचा समावेश होतो; किंवा

२०१३ चा १८.

(दोन) कोणतीही कंपनी किंवा निगम निकाय किंवा व्यक्तींचा अधिसंघ किंवा निकाय, भागीदारी संस्था, सहकारी किंवा अन्य सोसायटी, अधिसंघ, न्यास, अभिकरण संस्था, असा आहे;

(ग) "कुटुंब" याचा अर्थ, रक्ताचे किंवा वैवाहिक किंवा कायद्यानुसार केलेल्या दत्तक ग्रहणाने नातेसंबंध असलेल्या व्यक्तींचा गट, असा आहे;

---

[१] १० जानेवारी, २०२० पहा. अधिसूचना क्रमांक एसओ १३५ (ई), दि. १० जानेवारी, २०२०, पहा. **भारताचे राजपत्र**, असाधारण भाग दोन, अनुभाग (२) (दोन).

(घ) "समावेशक शिक्षण" याचा अर्थ, ज्यामध्ये तृतीयपंथी विद्यार्थी हे, भेदभाव, उपेक्षा, सतावणूक किंवा धाकदपटशा यांची भीती न बाळगता इतर विद्यार्थ्यांबरोबर एकत्र शिकतात आणि अशा विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या गरजा भागविण्यासाठी अध्ययन आणि अध्यापन पद्धतीत सुयोग्य बदल केले आहेत अशी शिक्षण पद्धती, असा आहे;

(ङ) "संस्था" याचा अर्थ, तृतीयपंथी व्यक्तींचा स्वीकार, संगोपन, संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण किंवा अन्य कोणत्याही सेवा यासाठी असलेली एखादी संस्था- मग ती सार्वजनिक किंवा खाजगी असो, असा आहे;

(च) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, त्याच्या अधिकारितेखालील क्षेत्रांच्या संबंधात नगरपालिका सेवा किंवा, यथास्थिती, मूलभूत सेवा पुरवण्यासाठी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेली महानगरपालिका किंवा नगरपालिका किंवा पंचायत किंवा इतर कोणताही स्थानिक निकाय, असा आहे;

(छ) "राष्ट्रीय परिषद" याचा अर्थ, कलम १६ अन्वये स्थापन केलेली तृतीयपंथी व्यक्तींची राष्ट्रीय परिषद असा आहे;

(ज) "अधिसूचना" याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे;

(झ) "मध्यलिंगी भिन्नता असलेली व्यक्ती" याचा अर्थ, जी, पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या शारीरिक प्रमाणस्थापक मानकापासून, त्याची किंवा तिची प्राथमिक लैंगिक अभिलक्षणे, बाह्य जननेंद्रिये, गुणसूत्रे किंवा संप्रेरके यांमध्ये, जन्मतः भिन्नता दर्शविते, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(ञ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली समुचित शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ट) "तृतीयपंथी व्यक्ती" याचा अर्थ, जिचा लिंगभाव, त्या व्यक्तीला जन्मतः प्राप्त झालेल्या लिंगभावाशी अनुरूप नसतो, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, तृतीयपंथी पुरुष किंवा तृतीयपंथी स्त्री ( मग अशा व्यक्तीने लिंग प्रतिरोपण शस्त्रक्रिया किंवा संप्रेरक उपचार किंवा लेसर उपचार किंवा यांसारखा अन्य उपचार केलेला असो किंवा नसो), मध्यलिंगी भिन्नता, मिश्रलिंगभाव असलेली व्यक्ती आणि किन्नर, हिजडा, अरवणी व जोगता अशी सामाजिक-सांस्कृतिक ओळख असलेली व्यक्ती, यांचा समावेश होतो.

## प्रकरण दोन

## भेदभाव करण्यास मनाई

**भेदभाव करण्यास मनाई असणे.**

**३.** कोणतीही व्यक्ती किंवा आस्थापना, कोणत्याही तृतीयपंथी व्यक्तीशी पुढीलपैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही :—

(क) शैक्षणिक आस्थापना व त्यांच्या सेवा नाकारणे, किंवा खंडित करणे, अथवा त्यांमध्ये अनुचित वागणूक देणे;

(ख) रोजगारामध्ये किंवा व्यवसायामध्ये, अथवा त्याबाबतीत अनुचित वागणूक देणे;

(ग) रोजगार किंवा व्यवसाय नाकारणे, किंवा तो रोजगार किंवा व्यवसाय समाप्त करणे;

(घ) आरोग्य देखभाल सेवा नाकारणे, किंवा खंडित करणे किंवा त्यामध्ये अनुचित वागणूक देणे;

(ङ) सर्वसामान्य जनतेच्या वापरासाठी समर्पित केलेल्या किंवा रुढीगतपणे जनतेसाठी उपलब्ध असलेल्या कोणत्याही वस्तू, जागा, सेवा, सुविधा, लाभ, विशेषाधिकार किंवा संधी नाकारणे किंवा खंडित करणे, किंवा त्या मिळण्याच्या किंवा पुरविण्याच्या किंवा त्यांचा उपभोग घेण्याच्या संबंधात, किंवा त्यांचा वापर करण्याच्या संबंधात अनुचित वागणूक देणे;

(च) संचार करण्याचा हक्क नाकारणे, किंवा खंडित करणे किंवा त्यासंबंधात अनुचित वागणूक देणे;

(छ) कोणत्याही मालमत्तेत राहण्याचा, ती खरेदी करण्याचा, भाड्याने घेण्याचा, किंवा अन्यथा तिचा भोगवटा करण्याचा हक्क नाकारणे, किंवा खंडित करणे किंवा त्यासंबंधात अनुचित वागणूक देणे;

(ज) सार्वजनिक किंवा खाजगी पदाकरिता उभे राहण्याची किंवा ते पद धारण करण्याची संधी नाकारणे किंवा खंडित करणे किंवा त्यासंबंधात अनुचित वागणूक देणे; आणि

(झ) जिच्या निगराणीत किंवा अभिरक्षेत तृतीयपंथी व्यक्तीस ठेवता येईल त्या अशा शासकीय किंवा खाजगी आस्थापनांमध्ये प्रवेश नाकारणे किंवा त्यातून काढून टाकणे किंवा त्यामध्ये अनुचित वागणूक देणे.

## प्रकरण तीन

## तृतीयपंथी व्यक्तींच्या ओळखीस मान्यता

**तृतीयपंथी व्यक्तीच्या ओळखीस मान्यता.**

४. (१) तृतीयपंथी व्यक्तीस या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरून, अशी तृतीयपंथी व्यक्ती म्हणून मान्यता प्राप्त करण्याचा हक्क असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तृतीयपंथी म्हणून मान्यता दिलेल्या प्रत्येक व्यक्तीस स्व-संवेदित लिंगभाव ओळख प्राप्त करण्याचा हक्क असेल.

**ओळख प्रमाणपत्रासाठी अर्ज.**

५. तृतीयपंथी व्यक्तीस, तृतीयपंथी व्यक्तीचे ओळख प्रमाणपत्र देण्याकरिता विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने आणि सोबत जोडलेल्या अशा कागदपत्रांसह जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :

परंतु, अज्ञान बालकाच्या बाबतीत, अशा बालकाच्या मातापित्याद्वारे किंवा पालकाद्वारे असा अर्ज, करण्यात येईल.

**ओळख प्रमाणपत्र देणे.**

६. (१) जिल्हा दंडाधिकारी, कलम ५ अन्वये अर्जदाराला, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीचे अनुसरण करून आणि अशा नमुन्यात व रीतीने अशा मुदतीत तृतीयपंथी म्हणून अशा व्यक्तीचा लिंगभाव दर्शविणारे, तृतीयपंथी व्यक्ती असल्याचे ओळख प्रमाणपत्र देईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या प्रमाणपत्रास अनुसरून सर्व शासकीय दस्तऐवजांमध्ये तृतीयपंथी व्यक्तीच्या लिंगभावाची नोंद करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये एखाद्या व्यक्तीला दिलेल्या प्रमाणपत्रामुळे तृतीयपंथी व्यक्तीचे हक्क प्रदान होतील आणि तृतीयपंथी व्यक्ती म्हणून तिच्या ओळखीच्या मान्यतेचा ते एक पुरावा असेल.

**लिंगभावात बदल करणे.**

७. (१) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रमाणपत्र दिल्यानंतर, जर एखाद्या तृतीयपंथी व्यक्तीने, एकतर पुरुष किंवा स्त्री म्हणून लिंगभावात बदल करण्यासाठी शस्त्रक्रिया करून घेतली असेल तर, अशा व्यक्तीस, ज्या वैद्यकीय संस्थेतून त्या व्यक्तीने अशी शस्त्रक्रिया करून घेतली असेल त्या वैद्यकीय संस्थेच्या वैद्यकीय अधीक्षकाने किंवा मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने तशा आशयाच्या दिलेल्या प्रमाणपत्रासह, सुधारित प्रमाणपत्राकरिता विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) जिल्हा दंडाधिकारी, वैद्यकीय अधीक्षकाने किंवा मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्रासह अर्ज प्राप्त झाल्यावर, आणि अशा प्रमाणपत्राच्या अचूकतेविषयी खात्री पटल्यावर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने आणि अशा मुदतीत लिंगभावात बदल दर्शविणारे प्रमाणपत्र देईल.

(३) जिला कलम ६ अन्वये ओळख प्रमाणपत्र किंवा पोट-कलम (२) अन्वये सुधारित प्रमाणपत्र देण्यात आले आहे ती व्यक्ती, जन्म दाखल्यातील आणि अशा व्यक्तीच्या ओळखीच्या संबंधातील इतर सर्व शासकीय दस्तऐवजांमधील पहिले नाव बदलून घेण्यास हक्कदार असेलः

परंतु, लिंगभावातील अशा बदलामुळे आणि पोट-कलम (२) अन्वये सुधारित प्रमाणपत्र दिल्यामुळे, या अधिनियमाखालील अशा व्यक्तीच्या हक्कांवर व हक्कदारींवर कोणताही परिणाम होणार नाही.

## प्रकरण चार

## शासनाकडून कल्याणकारी उपाययोजना

**समुचित शासनाचे आबंधन.** ८. (१) समुचित शासन, तृतीयपंथी व्यक्तींचा समाजातील पूर्ण व प्रभावी सहभाग आणि समाजातील त्यांचा समावेश सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करील.

(२) समुचित शासन, तृतीयपंथी व्यक्तींच्या हक्कांचे आणि हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी, विहित करण्यात येतील अशा कल्याणकारी उपाययोजना करील, आणि त्या शासनाने तयार केलेल्या कल्याणकारी योजनांच्या सवलती मिळण्याचा त्यांचा मार्ग सुकर करील.

(३) समुचित शासन, तृतीयपंथीप्रती संवेदनशील, अलांछनकारी व भेदभावरहित असलेल्या कल्याणकारी योजना व कार्यक्रम तयार करील.

(४) समुचित शासन, तृतीयपंथी व्यक्तींच्या गरजा भागविण्यासाठी, अशा व्यक्तींची सुटका, संरक्षण व पुनर्वसन करण्यासाठी उपाययोजना हाती घेईल.

(५) समुचित शासन, सांस्कृतिक व मनोरंजनपर उपक्रमांमध्ये सहभाग घेण्याच्या तृतीयपंथी व्यक्तींच्या हक्कांना चालना देण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी यथोचित उपाययोजना करील.

## प्रकरण पाच

## आस्थापना व अन्य व्यक्ती यांचे आबंधन

**रोजगारात भेदभाव न करणे.** ९. कोणतीही आस्थापना, सेवाभरती, पदोन्नती व इतर संबंधित विषयांसह परंतु त्यापुरतेच मर्यादित न राहता, रोजगाराशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबींमध्ये कोणत्याही तृतीयपंथी व्यक्तीशी भेदभाव करणार नाही.

**आस्थापनांची आबंधने.** १०. प्रत्येक आस्थापना, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अनुपालनाची सुनिश्चिती करील आणि विहित करण्यात येतील अशा सुविधा तृतीयपंथी व्यक्तींना पुरवील.

**तक्रार निवारण यंत्रणा.** ११. प्रत्येक आस्थापना, या अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाशी संबंधित असणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्याकरिता एका व्यक्तीस, तक्रार अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील.

**निवासाचा हक्क.** १२. (१) कोणत्याही बालकास, अशा बालकाच्या हितार्थ एखाद्या सक्षम न्यायालयाच्या आदेशावरून असेल त्याखेरीज, तृतीयपंथी असण्याच्या कारणावरून मातापित्यापासून किंवा निकटवर्ती कुटुंबापासून विभक्त केले जाणार नाही.

(२) प्रत्येक तृतीयपंथी व्यक्तीस,—

(क) जेथे मातापिता किंवा निकटवर्ती कुटुंबातील सदस्य राहतात त्या घरात राहण्याचा हक्क असेल;

(ख) अशा घरातून किंवा त्याच्या कोणत्याही भागापासून काढून टाकली न जाण्याचा हक्क असेल; आणि

(ग) अशा घरातील सुविधांचा भेदभावरहित रीतीने उपभोग घेण्याचा व वापर करण्याचा हक्क असेल.

(३) जेव्हा तृतीयपंथी व्यक्तीचे मातापिता किंवा तिच्या निकटवर्ती कुटुंबातील सदस्य, यापैकी कोणीही तिचे संगोपन करण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत, सक्षम न्यायालय, आदेशाद्वारे, अशा व्यक्तीला पुनर्वसन केंद्रात ठेवले जाण्याचा निर्देश देईल.

## प्रकरण सहा

## तृतीयपंथी व्यक्तींचे शिक्षण, सामाजिक सुरक्षा व आरोग्य

**तृतीयपंथी व्यक्तींना समावेशक शिक्षण देण्याचे शैक्षणिक संस्थांचे आबंधन.**

**१३.** समुचित शासनाकडून निधी पुरवठा केलेली किंवा मान्यता दिलेली प्रत्येक शिक्षणसंस्था, भेदभाव न करता, इतरांबरोबर समान तत्त्वावर तृतीयपंथी व्यक्तींना समावेशक शिक्षण आणि क्रीडा, मनोरंजन व छंदपोक्रम यांच्या संधी पुरवील.

**व्यवसाय प्रशिक्षण व स्वयं-रोजगार.**

**१४.** समुचित शासन, तृतीयपंथी व्यक्तींची, उपजीविका सुकर होण्यासाठी व त्यांना सहाय्य होण्यासाठी, त्यांचे व्यवसाय प्रशिक्षण व स्वयं-रोजगार यांसह कल्याणकारी योजना व कार्यक्रम तयार करील.

**आरोग्य देखभाल सुविधा.**

**१५.** समुचित शासन, तृतीयपंथी व्यक्तींच्या संबंधात पुढील उपाययोजना करील :—

(क) राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेने याबाबतीत जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून अशा व्यक्तींचे सीरम संनिरीक्षण करण्याकरिता स्वतंत्र मानवी प्रतिक्षमहीनता विषाणू सीरम संनिरीक्षण केंद्रे उभारणे;

(ख) लिंग प्रतिरोपण शस्त्रक्रिया व संप्रेरक उपचार यांसह वैद्यकीय देखभाल सुविधेची तरतूद करणे;

(ग) लिंग प्रतिरोपण शस्त्रक्रिया व संप्रेरक उपचार घेण्यापूर्वी व त्यानंतर समुपदेशन करणे;

(घ) तृतीयपंथीच्या जागतिक व्यावसायिक अधिसंघाच्या आरोग्यविषयक मार्गदर्शक तत्त्वांनुसार, लिंग प्रतिरोपण शस्त्रक्रियेशी संबंधित असलेली एक आरोग्यविषयक नियमपुस्तिका प्रसिद्ध करणे;

(ङ) त्यांच्या विशिष्ट आरोग्यविषयक समस्यांचे निवारण करण्याकरिता वैद्यकीय अभ्यासक्रमाचे व डॉक्टरांच्या संशोधनाचे पुनर्विलोकन करणे;

(च) रुग्णालये व इतर आरोग्य देखभाल संस्था आणि केंद्र यांमधील तृतीयपंथी व्यक्तींचा प्रवेश सुकर करणे;

(छ) तृतीयपंथी व्यक्तींची लिंग प्रतिरोपण शस्त्रक्रिया, संप्रेरक उपचार, लेसर उपचार किंवा अन्य कोणत्याही आरोग्यविषयक समस्या यांकरिता समावेशक विमा योजनेद्वारे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची तरतूद करणे.

## प्रकरण सात

## तृतीयपंथी व्यक्तींची राष्ट्रीय परिषद

तृतीयपंथी व्यक्तींची राष्ट्रीय परिषद.

**१६.** (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, तृतीयपंथी व्यक्तींची एक राष्ट्रीय परिषद घटित करील.

(२) राष्ट्रीय परिषदेत—

(क) सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचा प्रभारी केंद्रीय मंत्री, पदसिद्ध अध्यक्ष;

(ख) शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचा प्रभारी राज्यमंत्री, पदसिद्ध उपाध्यक्ष;

(ग) सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध सदस्य;

(घ) आरोग्य व कुटुंब कल्याण, गृह कार्य, गृहनिर्माण व नगर कार्य, अल्पसंख्याक कार्य, मानव संसाधन विकास, ग्रामीण विकास, श्रम व रोजगार मंत्रालये आणि विधि कार्ये, निवृत्तिवेतन व निवृत्तिवेतनधारक कल्याण विभाग आणि राष्ट्रीय भारत परिवर्तन आयोग संस्था यांमधील भारत सरकारच्या सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला प्रत्येकी एक प्रतिनिधी, पदसिद्ध सदस्य;

(ङ) राष्ट्रीय मानव अधिकार आयोग व राष्ट्रीय महिला आयोग यांचा, भारत सरकारच्या सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला प्रत्येकी एक प्रतिनिधी, पदसिद्ध सदस्य;

(च) राज्य शासनाचा व केंद्र शासित प्रदेशांचा, केंद्र सरकारकडून, आळीपाळीने, नामनिर्देशित करावयाचा उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम व ईशान्य प्रदेशांतील प्रत्येकी एक प्रतिनिधी पदसिद्ध सदस्य;

(छ) राज्य शासनातून व संघ राज्यक्षेत्रातून केंद्र सरकारकडून, आळीपाळीने नामनिर्देशित करावयाचे, उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम व ईशान्य प्रदेशांतील प्रत्येकी एक याप्रमाणे तृतीयपंथी समुदायाचे पाच प्रतिनिधी, सदस्य;

(ज) केंद्र सरकारकडून नामनिर्देशित करावयाचे, तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणार्थ काम करणाऱ्या अशासकीय संघटना किंवा अधिसंघ यांचे प्रतिनिधित्व करणारे पाच तज्ज्ञ सदस्य;

(झ) तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणाशी संबंधित असलेल्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयातील भारत सरकारचा सहसचिव, पदसिद्ध सदस्य-सचिव,

यांचा समावेश असेल.

(३) पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त, राष्ट्रीय परिषदेचा कोणताही सदस्य, त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

परिषदेची कार्ये.

**१७.** राष्ट्रीय परिषद पुढील कार्ये पार पाडील, ती अशी :—

(क) तृतीयपंथी व्यक्तींच्या बाबतीतील धोरणे, कार्यक्रम, विधिविधान व प्रकल्प तयार करण्याबाबत केंद्र सरकारला सल्ला देणे;

(ख) समानता व तृतीयपंथी व्यक्तींचा संपूर्ण सहभाग साध्य करण्याकरिता तयार केलेल्या धोरणांचे व कार्यक्रमांचे संनियंत्रण करणे व त्यांच्या परिणामांचे मूल्यमापन करणे;

(ग) जे तृतीयपंथी व्यक्तींशी संबंधित असणाऱ्या बाबींवर कार्यवाही करतात असे शासनाचे सर्व विभाग आणि अन्य शासकीय व अशासकीय संघटना, यांच्या उपक्रमांचा आढावा घेणे व त्यात समन्वय साधणे;

(घ) तृतीयपंथी व्यक्तींच्या तक्रारींचे निवारण करणे; आणि

(ङ) केंद्र सरकारकडून विहित करण्यात येतील अशी, अन्य कार्ये पार पाडणे.

## प्रकरण आठ

## अपराध व शास्ती

**१८.** जो कोणी,— **अपराध व शास्ती.**

(क) सरकारद्वारे सार्वजनिक प्रयोजनार्थ लादलेल्या कोणत्याही अनिवार्य सेवांव्यतिरिक्त वेठबिगार किंवा बंधबिगार म्हणून काम करण्यासाठी तृतीयपंथी व्यक्तीस, भाग पाडील किंवा भुरळ पाडील;

(ख) तृतीयपंथी व्यक्तीचा सार्वजनिक ठिकाणी जाण्याचा हक्क नाकारील किंवा ज्या सार्वजनिक ठिकाणी इतर व्यक्तींना प्रवेश आहे किंवा त्याचा वापर करण्याचा हक्क आहे, अशा सार्वजनिक ठिकाणाचा वापर करण्यापासून किंवा तेथे प्रवेश करण्यापासून अशा व्यक्तींना अडथळा करील;

(ग) तृतीयपंथी व्यक्तींस घर, गाव किंवा निवासाचे अन्य ठिकाण सोडण्यास भाग पाडील किंवा तसे करण्यास कारणीभूत ठरील;

(घ) तृतीयपंथी व्यक्तीचे जीवित, सुरक्षा, आरोग्य व कल्याण यास हानी किंवा क्षती किंवा धोका पोहोचवील- मग तो मानसिक किंवा शारीरिक असो, किंवा तिच्या शारीरिक दुरुपयोगास, लैंगिक दुरुपयोगास, शाब्दिक व भावनिक दुरुपयोगास आणि आर्थिक दुरुपयोगास कारणीभूत ठरण्याचा समावेश असणारी कृत्ये करण्याकडे कल असेल,

तो, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

## प्रकरण नऊ

## संकीर्ण

**१९.** केंद्र सरकार, याबाबतीत कायद्याद्वारे संसदेने वेळोवेळी केलेल्या नियत विनियोजनानंतर, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा रकमा, राष्ट्रीय परिषदेकडे जमा करील. **केंद्र सरकारकडून अनुदाने.**

**२०.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याशिवाय असतील आणि त्याचे न्यूनकरण करणार नाहीत. **अधिनियम इतर कोणत्याही कायद्याला न्यूनकारी नसणे.**

**२१.** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत समुचित शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा शासनाचा कोणताही अधिकारी यांच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. **सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.**

नियम करण्याचा समुचित शासनाचा अधिकार.

**२२.** (१) समुचित शासनास, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ५ अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करण्यात येईल तो नमुना व ती रीत;

(ख) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या कार्यपद्धतीनुसार, ज्या नमुन्यात व ज्या रीतीने आणि ज्या कालावधीत ओळख प्रमाणपत्र देण्यात येईल ती कार्यपद्धती, तो नमुना व ती रीत आणि तो कालावधी;

(ग) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने एखादा अर्ज करण्यात येईल तो नमुना व ती रीत;

(घ) कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये सुधारित प्रमाणपत्र देण्याच्या अर्जाचा नमुना, कालावधी व रीत;

(ङ) कलम ८ च्या पोट-कलम (२) अन्वये तरतूद करावयाच्या कल्याणकारी उपाययोजना;

(च) कलम १० अन्वये तरतूद करावयाच्या सुविधा;

(छ) कलम १७ च्या खंड (ङ) खालील राष्ट्रीय परिषदेची इतर कार्ये; आणि

(ज) विहित करण्याची आवश्यकता असेल किंवा विहित करता येईल, अशी अन्य कोणतीही बाब.

(३) केंद्र सरकारने पोट-कलम (१) अन्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, एकाच सत्रात अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, ते सत्रासीन असताना ठेवण्यात येईल; आणि जर, पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(४) पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर, जेथे राज्य विधिमंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेथे त्या प्रत्येक सभागृहासमोर किंवा जेथे राज्य विधिमंडळ एका सभागृहाने बनलेले असेल तेथे, त्या सभागृहासमोर मांडण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२३.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्भवली तर, केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्या अडचणी दूर करण्याकरिता, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**डॉ. राजीव मणि,**
सचिव,
भारत सरकार.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.